www.yuvakadhar.in
E mail - dainikyuvakaadhar@gmail.com
facebook : yuvakadhar

दैनिक
तरुणांचा बुलंद आवाज
मराठी
# युवक आधार




संपादक - संतोष शिवदास आमले
मुख्य संपादक - भारती आमले   उपसंपादक - श्री विलास गायकवाड   कार्यकारी संपादक - श्री जगन्नाथ रासवे   निवासी संपादक- श्री राकेश पाटील   सह संपादक - श्री मुकुंद कांबळे   महाराष्ट्र संपादक - श्री अजय कापरे
वर्ष : 3   अंक : ७८   बुधवार, २६ नोव्हेंबर २०२५   किंमत : ४ रु   पृष्ठ : ८   RNI MAHMAR/2023/89514

# महिलांच्या आर्थिक सक्षमीकरणास शासनाचे प्रथम प्राधान्य - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

## महिलांच्या शाश्वत उपजीविकेसाठी 'उमेद–एमएसआरएलएम' व 'राह फाउंडेशन'चा सामंजस्य करार




**दैनिक युवक आधार मुंबई :** राज्यातील ग्रामीण भागातील महिलांना अर्थार्जनासाठी विविध संधी उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने ग्रामविकास विभागांतर्गत उमेद अभियानांतर्गत काम सुरू आहे. ग्रामीण आणि आदिवासी भागातील महिलांना आर्थिक सक्षमता व शाश्वत उपजीविकेच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी उमेद–महाराष्ट्र राज्य ग्रामीण आजीविका अभियान (MSRLM) आणि राह फाउंडेशन यांच्यातील सामंजस्य करार (MoU) निश्चितच व्यापक प्रमाणावर विस्तार करण्यास सहायक ठरेल , असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.

ग्रामीण आणि आदिवासी भागातील महिलांना आर्थिक सक्षमता व शाश्वत उपजीविकेच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी उमेद–महाराष्ट्र राज्य ग्रामीण आजीविका अभियान (MSRLM) आणि राह फाउंडेशन यांच्यात सामंजस्य करार करण्यात आला.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेतून ग्रामीण भागातील जनतेला आर्थिक विकासाच्या संधी निर्माण करण्यासाठी वैविध्यपूर्ण उपक्रम राबविले जात आहेत. प्रामुख्याने पालघर, नाशिक आणि रायगड या भागातील आदिवासी तसेच ग्रामीण महिलांसाठी त्यांच्या अंगभूत कौशल्याचा आणि स्थानिक संसाधनाचा वापर करून संधीचा विस्तार करण्यात येणार आहे. ग्रामीण महिलांना आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी आणि सक्षम करण्यासाठी उमेदसह विविध योजना, उपक्रम राबविले जात आहेत. राह फाऊंडेशन सोबतच्या सामंजस्य कराराने या तीन जिल्ह्यांतील महिलांना तांत्रिक ज्ञान, अद्ययावत माहिती यांच्या सहाय्याने अधिक सक्षम करण्याच्या दृष्टीने भरीव प्रयत्न करण्यात येणार आहे.

**कराराचा उद्देश**

या कराराचा उद्देश पालघर, नाशिक आणि रायगड जिल्ह्यांतील महिलांना हवामान, स्मार्ट शेती, जलसुरक्षा आणि निसर्गाधारित उपजीविका उपक्रमांद्वारे सक्षम करणे आहे. राह फाऊंडेशनचे तांत्रिक ज्ञान आणि उमेदच्या स्वयं-सहायता गटांचे (SHGs) विस्तृत जाळे यांचा समन्वय साधून ग्रामीण महिलांना साधन संपत्ती, प्रशिक्षण आणि बाजार पेठेतील संधी मिळतील.

**राबविण्यात येणारे उपक्रम**

या भागीदारीअंतर्गत तीनही जिल्ह्यांमध्ये दोन नर्सरी विकास व जैव-उत्पादन केंद्रे उभारली जाणार असून ५ हजारांहून अधिक महिला आणि शेतकऱ्यांना त्याचा लाभ होईल. तसेच महिलांच्या सहभागाने फूड फॉरेस्ट प्रकल्प उभारला जाणार आहे, ज्यातून प्रत्येक महिलेला वर्षाला १ लाख रुपयांपर्यंत उत्पन्न मिळण्याची अपेक्षा आहे.या उपक्रमांतर्गत वन धन योजना, पीएमएफएमई, एनएचएम, आरसेटीआय यासारख्या विविध शासकीय योजनांशी एकत्रिकरण करून महिला शेतकऱ्यांना कर्ज, विमा, बाजारपेठ व प्रशिक्षण उपलब्ध करून दिले जाणार आहे.

## उपविभागीय दक्षता व नियंत्रण समितीच्या सदस्य पदी राहुल सोनावळे यांची नियुक्ती

**दैनिक युवक आधार**

**पनवेल / निलेश सोनावणे :** अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती अत्याचार प्रतिबंध अधिनियम १९८९ अंतर्गत उपविभागीय दक्षता व नियंत्रण समितीचे सचिव तथा रोहा पंचायत समितीचे गटविकास अधिकरी यांनी अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती अत्याचार प्रतिबंध अधिनियम १९८९ अंतर्गत उपविभागीय दक्षता व नियंत्रण समिति स्थापन केली असून या समितीमध्ये सामाजिक कार्यकर्ते तथा रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया आठवले गटाचे रायगड जिल्हा संपर्क प्रमुख राहुल सोनावळे यांची सदस्य पदी नियुक्ती करण्यात केली आहे .अनुसूचित जाती जमाती अत्याचार प्रतिबंध कायद्याच्या अंमलबजावणीसाठी उपविभागीय अधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात आलेली आहे. त्या अनुषंगाने उपविभागीय दक्षता व नियंत्रण समिती मध्ये राहुल सोनावळे यांची नियुक्ती करण्यात आली असून



राहुल सोनावळे हे रायगड जिल्ह्यात अनेक वर्षांपासून सामाजिक काम करीत आहेत रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया चे राष्ट्रीय अध्यक्ष तथा केंद्रीय सामाजिक न्याय राज्य मंत्री रामदास आठवले यांचे विश्वासू कार्यकर्ते असून रायगड जिल्ह्यात कुठेहि दलित ,आदिवासी ,बहुजन समाजावर अन्याय होत असेल तेव्हा नेहमी ते अग्रेसर राहून पीडितांना न्याय देण्यासाठी कार्यरत असतात .त्यांच्या कामाची दखल शासनाने घेऊन समितीचे सचिव यांनी राहुल सोनावळे यांची निवड सदस्य पदी केल्याने जिल्ह्यातील भीमसैनिकांनी त्यांच्यावर शुभेच्छांचा वर्षाव केला आहे .



**खोपोली नगरपरिषद सार्वत्रिक निवडणूक २०२५:भाजप-शिवसेना-आर पी आय महायुतीचे नगराध्यक्ष पदाचे उमेदवार कुलदीपजी शेंडे व महायुतीचे सर्व उमेदवारांची प्रभाग निहाय प्रचार रॅली काढण्यात आली होती.या रॅली मध्ये प्रमुख उपस्थिती भाजप जिल्हा सरचिटणीस तथा नगरसेवक निरीक्षक प्रकाशजी बिनेदार,मा. नगराध्यक्ष सुनिलभाई घरत,भाजप अल्पसंख्यांक मोर्चाचे प्रदेश उपाध्यक्ष तथा अल्पसंख्यांक खोपोली प्रभारी सय्यद अकबर,भाजप खोपोली शहरध्यक्ष अजय इंगूलकर,भाजप खांदाकॉलनीचे अध्यक्ष दशरथ म्हात्रे,सरचिटणीस भीमराव पोवार,मा.नगरसेविका राजेश्री वावेकर,युवा नेते किशोर चोतमल,भाजप नेते मोतीराम कोळी आदी पदाधिकारी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.**

( दैनिक युवक आधार )

## तळोजा एमआयडीसीत 'फाईब्रो कास्ट' कंपनीला भीषण आग

**दैनिक युवक आधार**

**पनवेल (वार्ताहर) :** तळोजा एमआयडीसीमधील 'फाईब्रो कास्ट' या कंपनीला सकाळी अचानक भीषण आग लागून मोठा आर्थिक नुकसान झाल्याची माहिती मिळत आहे. धुराचे प्रचंड लोट आणि आगीच्या तीव्रतेमुळे परिसरात काही काळ दहशतीचे वातावरण निर्माण झाले होते.घटनेची माहिती मिळताच तळोजा एमआयडीसी अग्निशामक दलाच्या पथकाने तातडीने घटनास्थळी धाव घेत अनेक फायर टॅंकर्सच्या सहाय्याने आग नियंत्रणात आणली. तसेच



आगीतून पसरणारा धूर आणि ज्वाळा रोखण्यासाठी अतिरिक्त दलाची मदतही घेण्यात आली. अखेर शर्थीच्या प्रयत्नांनंतर आग आटोक्यात आणण्यात यश आले. सुदैवाने या दुर्घटनेत कोणतीही जीवितहानी झालेली नाही. मात्र यंत्रसामग्री, तयार साहित्य व कच्चा माल जळून कंपनीचे मोठे नुकसान झाल्याची प्राथमिक माहिती समोर येत आहे. आग लागण्याचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झाले नसून याबाबत तळोजा पोलीस तसेच औद्योगिक सुरक्षा व आरोग्य विभागाने स्वतंत्र तपास सुरू केला आहे. विजेच्या शॉर्टसर्किटची शक्यता नाकारण्यात आलेली नाही. दरम्यान, तळोजा एमआयडीसी परिसरात गेल्या काही महिन्यांपासून आग लागण्याच्या घटनांमध्ये सातत्य आल्याने औद्योगिक सुरक्षेबाबत गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

## शिरूरकरांनी साहित्य चळवळ जोपासली – प्राचार्य दीपाताई क्षीरसागर

**दैनिक युवक आधार**

**शिरूर कासार प्रतिनिधी :** मराठी भाषा विभाग, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ मुंबई यांचे वतीने आयोजित करण्यात आलेल्या सातव्या सिंदफणा मराठी साहित्य संमेलन२०२५ च्या बोधचिन्हाचे अनावरण प्राचार्य दीपाताई क्षीरसागर यांचे हस्ते दि. २४ रोजी करण्यात आले.

शिरूर कासार तालुक्यात साहित्य चळवळ सातत्यपूर्ण सुरू आहे. साहित्यिक चळवळ उभी राहिली पाहिजे अशी अपेक्षा प्राचार्य दीपाताई क्षीरसागर यांनी व्यक्त केली. दि. १६ आणि १७ डिसेंबर रोजी शिरूर कासार येथे होणारे सिंदफणा मराठी साहित्य संमेलन आगळे वेगळे ठरणार आहे. त्या अनुषंगिक बोधचिन्हाचे अनावरण सहाव्या सिंदफणा मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्ष दीपाताई क्षीरसागर यांच्या हस्ते करण्यात आले.

सिंदफणा नदी ही बीड जिल्ह्यातील जीवनवाहिनी



आहे. सिंदफणा नदीच्या काठावर वसलेले भाषिक, सांस्कृतिक जनजीवन साहित्याच्या माध्यमातून चित्रीत करण्याचा संदेश बोधचिन्हातून देण्यात आला आहे. याप्रसंगी आजिनाथ गवळी, मसाप शिरूरचे माजी अध्यक्ष प्रा. डॉ. अशोक घोळवे, साहित्यिक डॉ. विठ्ठल जाधव, सतिश मुरकुटे, जमीर शेख आदी उपस्थित होते.

## संविधान दिनानिमित्त वाजेकर महाविद्यालयात आंतरराष्ट्रीय परिषदेचे आयोजन

**दैनिक युवक आधार**

**उरण / सायली साळुंके :** भारतीय संविधान आणि विकसित भारत @२०४७ वरील आंतरराष्ट्रीय ई-परिषद:" समावेशक, लोकशाही आणि शाश्वत राष्ट्र-उभारणीसाठी पाया "

असे या परिषदेचे शीर्षक व उपशीर्षक असून भारतीय राज्यघटनाचा अमृत महोत्सव व भारतीय स्वातंत्र्याचा आगामी शतक महोत्सव या अनुषंगाने विकसित भारत ही संकल्पना राज्यशास्त्र विभाग प्रमुख डॉ संदीप घोडके यांनी मांडली व त्यास महाविद्यालय विकास समितीचे चेअरमन माननीय बाळाराम पाटील, रयत शिक्षण संस्थेचे मॅनेजिंग कौन्सिलमधील जेष्ठ सदस्य माननीय रामशेठ ठाकूर व इतर सदस्यांनी मंजूर केलेली ही आंतरराष्ट्रीय परिषद यशस्वी करण्याकरिता गेल्या दोन महिन्यापासून प्रभारी प्राचार्य डॉ अमोल ठक्कर, आयोजक डॉ संदीप घोडके व सर्व प्राध्यापक वृंद अविरत प्रयत्न करीत आहेत.

बुधवार दिनांक २६/११/२०२५ रोजी दिवसभर ऑनलाइन पद्धतीने चालणाऱ्या या परिषदेचे उद्घाटन मुंबई व शिवाजी विद्यापीठाचे माजी कुलगुरू तसेच महाराष्ट्र लोकसेवा आयोगाचे मा.अध्यक्ष डॉ देवानंद शिंदे यांच्या हस्ते सकाळी १०.३० वाजता संपन्न होत आहे .

## आता सेकंड क्लासचा प्रवास होणार गारेगार! ; मुंबई उपनगरीय रेल्वेच्या ताफ्यात लवकरच सर्व लोकल एसी होणार

**दैनिक युवक आधार**

**मुंबई :** तसेच नवी मुंबई विमानतळ हे भारतातील पहिले विमानतळ ठरणार असून तेथून गेट वे ऑफ इंडियापर्यत वॉटर टॅक्सीने प्रवास करणे शक्य होणार आहे, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला.

वरळी येथील डोम मध्ये आयोजित 'आयआयएमयूएन' कार्यक्रमात ते बोलत होते. "अटल सेतू, कोस्टल रोड, मेट्रोचे जाळे विस्तारले जाणार याविषयी बोलायचो तेव्हा विरोधक ट्रोल करत होते, विधानसभेतही चेष्टा करायचे. परंतु मुंबईचा



विकास झपाट्याने होत असून मुंबईचा आताचा विकास हा ट्रेलर आहे. पुढील पाच ते सात वर्षांत मुंबईचा चेहरामोहरा बदलणार आहे," असा विश्वास त्यांनी यावेळी व्यक्त केला. "सध्या ६० टक्के मुंबईकर वेस्टर्न एक्स्प्रेस-वेचा वापर करतात. वेस्टर्न एक्स्प्रेस हायवेवरील वाहतूककोंडी फोडण्यासाठी कोस्टल रोड वरळी ते अटल सेतू असा थेट प्रवास करण्यासाठी उड्डाणपूल बांधण्यात येत असून तो वर्षभरात पूर्ण होईल. दरवर्षी ५० किमीचे मेट्रोचे जाळे निर्माण केले जाणार असून यामुळे मुंबईत कुठूनही कुठे जाणे शक्य होणार आहे," असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

"मुंबई वन ॲप तयार केले असून एकाच तिकिटावर रेल्वे, मेट्रो, बेस्ट बस व मोनोचा प्रवास करता येणार आहे. रो-रो सर्विस अलिबागपर्यंत आहे. परंतु आता वॉटर ट्रान्सपोर्ट तयार करण्यात येत आहे. यातील प्रत्येक गोष्ट फक्त कागदावर नसून प्रत्यक्ष अंमलबजावणी स्तरावर आहे," असेही ते म्हणाले.

**१५ डब्यांच्या लोकल फेऱ्या वाढणार**

मध्य रेल्वेच्या ताफ्यात १५ डब्यांच्या लोकल गाड्या दाखल होणार असून त्यासाठी ३४ स्थानकांवरील प्लॅटफॉर्म विस्ताराचे कामही पूर्ण होणार आहे. यामुळे लोकलची गर्दी काही प्रमाणात कमी होण्याची शक्यता आहे. "१२ डब्यांच्या लोकलला १५ डब्यांमध्ये रूपांतरित करण्याची योजना बराच काळ प्रलंबित होती. पण मुंब्रा दुर्घटनेनंतर हा प्रस्ताव गतीने पुढे नेण्यात आला.







## ज्यांचा पेण शहरासाठी स्वतःचा काहीच योगदान नाही ; त्याला दुसऱ्याला प्रश्न विचारायचा काहीच अधिकारी नाही

**दैनिक युवक आधार**

**पेण दीपक लोके :** पेण नगरपालिका सार्वत्रिक निवडणूक 2025 ची रणधुमाळी सुरु असून प्रत्येक प्रभागात जोरदार प्रचार सुरू आहे. भाजप राष्ट्रवादी आणि आर पी आय महायुतीचे उमेदवार प्रत्येक मतदारापर्यंत पोहचत आहेत. आज प्रभाग क्रमांक 4 चे उमेदवार सागर सदाशिव पवार आणि हर्षा अनिरुद्ध पाटील यांच्या प्रचाराचा नारळ फोडून जोरदार घोषणाबाजी करीत प्रचाराला सुरुवात झाली.प्रभाग क्रमांक 4 मध्ये सागर पवार आणि हर्षा पाटील यांना नागरिकांचा वाढता पाठिंबा मिळत असल्याने दोन्ही उमेदवार भरघोस मतांनी निवडून येणार असल्याचे बोलले जात आहे.त्याच प्रमाणे नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार प्रीतम ललित पाटील या जनतेचा विकास हाच अजेंडा घेऊन निवडणुकीत उतरल्या असून प्रत्येक मदतराचा आशीर्वाद घेण्यासाठी



फिरत आहेत.यावेळी नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार प्रीतम पाटील यांनी बोलताना सांगितले की, पेण शहरासाठी ज्यांचं स्वतःच काहीच योगदान नाही ; त्याला दुसऱ्याला प्रश्न विचारायचा काहीच अधिकारी नाही. कामाचे साक्षीदार आमची जनता आहे. आम्ही जो विकास केला आहे तो पारदर्शक स्वच्छ हेतूने माझा शहर माझा कुटुंब या भावनेने शहरासाठी काम केले आहे.त्यामुळे आमचे सर्व उमेदवार हे भरघोस मतांनी निवडून येतील असे त्यांनी सांगितले.

# भावना घाणेकर यांच्या सोशल मीडिया इम्पॅक्टचा कमालीचा प्रभाव

### व्हिडिओनंतर नगरपरिषद प्रशासनाला धडपड, शहरातील कचरा हटविण्याची मोहीम वेगात

**दैनिक युवक आधार**

**उरण वार्ताहर** : शहर स्वच्छतेचा प्रश्न जरी जुनाच असला, तरी तो पुन्हा प्रकाशझोतात आणण्याचे धाडस महाविकास आघाडी आणि समविचारी पक्षांकडून नगराध्यक्षपदासाठी उभ्या असलेल्या भावना घाणेकर यांनी केले—आणि त्याचा परिणाम आज उरणकरांना प्रत्यक्ष अनुभवायला मिळत आहे. त्यांच्या सोशल मीडियावर पोस्ट केलेल्या व्हिडिओंनी नगरपरिषद प्रशासनाला जणू झटका बसल्यासारखे झाले असून, शहरातील साचलेला, कुजलेला आणि ठिकठिकाणी पसरलेला कचरा हटविण्याचे काम तातडीने सुरू करण्यात आले आहे.



काही दिवसांपूर्वी घाणेकर यांनी शहरातील अरुंद रस्ते, गटारीजवळ साचलेला कचरा, तसेच मोरा फायर स्टेशन परिसरात डंपिंग ग्राउंडसारखी निर्माण झालेली परिस्थिती यावर प्रकाश टाकला होता. नागरिकांना त्रास होतोय, रोगराई वाढतेय, शहराची प्रतिमा मलिन होतेय—याकडे त्यांनी स्पष्ट शब्दांत लक्ष वेधले. त्यांच्या व्हिडिओंना अल्पावधीत हजारो व्ह्यूज मिळाले आणि नागरिकांची प्रतिक्रिया उसळली. सोशल मीडिया हा फक्त आवाज नसून कृतीला मजबूर करणारी ताकद आहे, याची आठवण या प्रकरणातून पुन्हा समोर आली.

निवेदने, मागण्या, अर्ज, तक्रारी—शहरवासीयांनी अनेक वर्षे हे सगळे अनुभवलं. पण जेव्हा एका धाडसी स्त्रीने शहराच्या नाड्या ओळखून कॅमेऱ्यासमोर शहराची वास्तविकता उघडी केली, तेव्हा प्रशासन हलले. मागील दोन दिवसांत नगरपरिषदेने शहरातील अनेक भागांतून कचरा उचलण्याची मोहीम सुरू केली आहे, तर मोरा फायर स्टेशन परिसरातील कचरा जेसीबीच्या सहाय्याने हटविण्यास सुरुवात झाली आहे. नागरिकांच्या चेहऱ्यावर हलकीशी समाधानाची झुळूक उमटलेली दिसत आहे.

उरणकरांमध्ये आता नव्या आशेची ज्योत पेटली आहे. सोशल मीडिया, जनमत, जबाबदारी आणि बदल—या सगळ्याची एक सुंदर सांगड जुळताना दिसते आहे.

# अनधिकृत फेरीवाले, चोऱ्या आणि ड्रग्स विक्री सुरूच

### "आता आश्वासने नव्हे, कृती हवी"- संतप्त विक्रोळीकरांचा पोलिसांना इशारा

**दैनिक युवक आधार**

**मुंबई / प्रतिनिधी :** विक्रोळी परिसरात अनधिकृत फेरीवाल्यांचा वाढता मनमानी कारभार, चोरीच्या सततच्या घटना आणि अमली पदार्थांची खुलेआम विक्री या तिन्ही गंभीर समस्यांवरून स्थानिक नागरिक संतापले आहेत. याच मुद्द्यांवर बुधवारी (१९ नोव्हेंबर) सायंकाळी ५ वाजता विक्रोळी पोलीस ठाण्यात नागरिकांची मोठी बैठक आयोजित करण्यात आली होती. बॉम्बे कॅथलिक सभा, विक्रोळी व्यापारी संघटना, विक्रोळीकर विकास मंच, दिशा वेल्फेअर ग्रुप यांसारख्या स्थानिक संस्थांनी संयुक्तरीत्या ही बैठक घेतली होती.



बैठकीत नागरिकांनी मुंबई उच्च न्यायालय आणि मुंबई पोलीस आयुक्तांनी फेरीवाला-मुक्त क्षेत्राबाबत दिलेल्या स्पष्ट आदेशांच्या प्रती थेट वरिष्ठ पोलीस निरीक्षक सूर्यकांत नाईकवाडे यांच्यासमोर ठेवल्या. तरीही बीएमसीच्या एस वॉर्डकडून तसेच स्थानिक पोलीस ठाण्याकडून प्रभावी कारवाई का होत नाही, याबाबत तीव्र नाराजी व्यक्त करण्यात आली.

"आम्ही कारवाई करतो, त्यानंतर बीएमसीला लेखी कळवतो. पुढची जबाबदारी त्यांची असते," असे स्पष्टीकरण नाईकवाडे यांनी दिले. मात्र, न्यायालयाच्या आदेशाचे काटेकोर पालन व्हावे यासाठी पोलीस कर्मचाऱ्यांना कठोर सूचना देण्यात येतील, असे आश्वासनही त्यांनी दिले.कन्नमवार नगर येथील बुद्ध विहारातून बुद्धमूर्ती चोरीच्या प्रकरणात अवघ्या २४ तासांत आरोपीला अटक केल्याबद्दल नागरिकांनी विक्रोळी पोलिसांचे कौतुकोद्गार काढले. मात्र, कन्नमवार नगर-२ आणि म्हाडा ट्रान्झिट कॅम्प परिसरात रात्रीच्या वेळी गस्तीचा पूर्णपणे अभाव असल्याची गंभीर तक्रार रॉबर्ट डिसोझा यांनी मांडली. यावर "बीट मार्शल नेमणे शक्य नाही, परंतु रात्रीची गस्त निश्चितच वाढवू," असे आश्वासन नाईकवाडे यांनी दिले.

अमली पदार्थांच्या वाढत्या विक्रीबाबत अरुण सावंत यांनी गंभीर चिंता व्यक्त केली. यावर संबंधितांविरुद्ध सातत्याने कारवाई सुरू असल्याचे पोलीस अधिकाऱ्यांनी सांगितले.

बैठकीला राजाराम राव, नितीन आडकर, आयवन डिसोझा, रॉबर्ट डिसोझा, अंकुश पवार, दिनेश बेरीशेट्टी, संजय येवले,अरुण सावंत यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. पोलीस दलातर्फे श्री. श्रीकांत मांढरे व श्री. गोपाळ जाधव (स्पेशल युनिट) उपस्थित होते.

शेवटी नागरिकांनी एकमुखाने सुनावले, "आता आश्वासने नव्हे, प्रत्यक्ष कृती हवी. उच्च न्यायालयाच्या आदेशाचा अवमान आम्ही खपवून घेणार नाही."

पुढील काही दिवसांत खरोखरच ठोस कारवाई होते की पुन्हा फक्त फाईल फिरती आणि आश्वासनांचीच पुनरावृत्ती होते, हे पाहण्याची वेळ आता विक्रोळीकरांवर आली आहे.

# श्री दत्त जयंती नियोजन आढावा बैठक संपन्न; नायब तहसीलदार कैलास जेठे यांनी दत्त जयंती निमित्त होणाऱ्या यात्रा महोत्सवाचा अधिकाऱ्याकडून घेतला आढावा

**दैनिक युवक आधार**

**श्रीक्षेत्र माहूर:(प्रतिनिधी) सय्यद ईसा :** श्रीक्षेत्र माहूर गडावर होणाऱ्या श्री दत्त जयंती यात्रा महोत्सवानिमित्त गडावर लाखो भाविक येणार असल्याने प्रशासनाकडून दि 25 रोजी दुपारी पंचायत समितीच्या कै वसंतराव नाईक सभागृहात बैठक घेण्यात आली या बैठकीत नायब तहसीलदार तहसीलदार कैलास जेठे यांनी सर्व उपस्थित विभाग प्रमुख आणि प्रतिनिधीकडून आढावा घेत सूचना केल्या तसेच गैरहजर अधिकारी कर्मचाऱ्यांनी दि 27 रोजी येथे होणाऱ्या बैठकीस सहाय्यक जिल्हाधिकारी जेनीत चंद्रा दोन्तूला हे उपस्थित राहणार असल्याने सर्वांनी आपापल्या अहवालासह हजर राहण्याच्या



सक्त सूचना केल्या

या बैठकीस नायब तहसीलदार कैलास जेठे नायब तहसीलदार सूर्यवंशी मॅडम सपोनी शरद घोडके सहाय्यक गवीअ पिडी मुरादे उपविभागीय अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग डि के भिसे तालुका आरोग्य अधिकारी डॉ आर डी माचेवार मराविमचे अभियंता आर बी शेंडे वैद्यकीय अधिकारी डॉ ए डी आंबेकर आगार प्रमुख चंद्रशेखर समर्थवाड राष्ट्रीय महामार्गाचे क अभियंता ए जी हजारे क अभियंता पी व्ही हंचाटे वनपाल एन एन कत्तुलवार जी एन नाईक पो का गजानन जाधव मंडळाधिकारी चंदनकर श्री दत्त शिखर संस्थांन चे सचिव प्राचार्य डॉ गणेश पाटील पंस चे एम एम लोणीकर तलाठी सी पी बाबर देव देवेश्वर संस्थानचे विश्वस्त एस एल कोथळकर श्री रेणुका देवी संस्थानचे विश्वस्त दुर्गादास भोपी श्री रेणुका देवी संस्थानचे व्यवस्थापक योगेश साबळे पत्रकार विजय आमले नंदकुमार जोशी सर इलियास बावाणी संजय घोगरे यांचे सह मान्यवर उपस्थित होते

यावेळी नायब तहसीलदार कैलास जेठे यांनी विभाग प्रमुखांना सक्त सूचना करून दरवर्षीप्रमाणे यात्रा नियोजनात कुठलीही कसर राहणार नाही याची दक्षता घेण्याचे आवाहन केले तसेच होणाऱ्या बैठकीत सर्वांनी दरवर्षी यात्रा नियोजनाच्या आढाव्यासह उपस्थित राहून यावर्षी भाविकांना सोयी सुविधा सुरक्षा मिळावी यासाठी काय नियोजन करण्यात आले याचाही तपशील सोबत घेऊन येण्याच्या सूचना केल्या .

# पनवेल वकील संघटना निवडणूक;पनवेल बार असोसिएशनची त्रैवार्षिक निवडणूक जाहीर

### अकरा जागांसाठी २५ नामनिर्देशनपत्र दाखल, २९ नोव्हेंबर २०२५ रोजी मतदान

**दैनिक युवक आधार**

**पनवेल (प्रतिनिधी) :** न्यायालयीन कामकाजात वकील, अशील, कर्मचारी आणि न्यायालयात उद्भवणारे प्रश्न तसेच समस्या सोडवण्यासाठी काम करीत असलेली पनवेल वकील संघटना म्हणजेच पनवेल बार असोसिएशनच्या व्यवस्थापन समितीच्या "जानेवारी २०२६ ते डिसेंबर २०२८" या कालावधीसाठी त्रैवार्षिक निवडणूक कार्यक्रम जाहीर झाला आहे. शनिवारी २९ नोव्हेंबर २०२५ रोजी पनवेल दिवाणी न्यायालयाच्या नवीन इमारतीमधील वकील (बाररूम) दालनात मतदान होणार असून त्याच दिवशी त्याच ठिकाणी सायंकाळी निकाल जाहीर करण्यात येणार आहे.

निवडणुकीत अध्यक्ष, उपाध्यक्ष, सचिव, सह सचिव (महिला राखीव), खजिनदार, ऑडिटर, सहखजिनदार प्रत्येकी एक तर दोन महिला राखीव कार्यकारिणी सदस्य तसेच दोन सर्वसाधारण कार्यकारिणी सदस्य अशी एकूण अकरा पदाधिकाऱ्यांच्या कार्यकारी मंडळाची निवड करण्यात येणार आहे. संघटनेच्या नोंदणीकृत १५८५ वकील सभासदांच्या पैकी ११६३ मतदार उमेदवारांना मतदान करणार आहेत. निवडणुक प्रक्रिया पार पाडण्यासाठी जेष्ठ वकील ॲड. एच. जे. शेळके यांची मुख्य निवडणूक अधिकारी म्हणून पनवेल बार असोसिएशनच्या वतीने नेमणूक करण्यात आली आहे.

अकरा जागांसाठी घेण्यात येणाऱ्या निवडणुकीत २५ उमेदवारांनी आपले उमेदवारी अर्ज दाखल केले असून यापैकी सात महिलांनी प्रतिनिधित्व सिद्ध करण्यासाठी नामनिर्देशनपत्र दाखल केले आहेत. अध्यक्ष पदासाठी ॲड. मनोज कृष्णाजी भुजबळ आणि ॲड. रत्नदीप राम पाटील, उपाध्यक्ष पदासाठी ॲड. संतोष जोमा म्हात्रे तसेच ॲड. सचिन अंबाजी म्हात्रे, सचिव पदासाठी ॲड. प्रल्हाद घनश्याम खोपकर आणि ॲड. नित्यानंद राम ठाकूर, सहसचिव ( महिला राखीव ) पदासाठी ॲड. हेमा सिताराम भगत आणि ॲड. दिपाली रामदास गावंड, खजिनदार पदासाठी ॲड. धनराज कान्हा तोकडे आणि ॲड. महेबूब गैबी पटेल, सहखजिनदार पदासाठी ॲड. विशाल लक्ष्मण डोंगरे आणि ॲड. हेमंत गंगाधर शिंदे तसेच ॲड. रोहिदास हरी आगलावे, ऑडिटर पदासाठी ॲड. भूषण मोरेश्वर म्हात्रे आणि ॲड. भास्कर रामचंद्र पाटील कार्यकारिणी सदस्य पदासाठी ॲड. विजयेंद्र नारायण मुंढे, ॲड. इर्शाद रमझान शेख, ॲड. आशिष विजय पनवेलकर, ॲड. जयसिंग जगन्नाथ शेरे, ॲड. नागेश अरविंद हिरवे तथा कार्यकारिणी सदस्य (महिला राखीव) पदासाठी ॲड. ज्योती पी. राऊत – उरणकर, ॲड. समीना साजिद खान, ॲड. दिपाली रवींद्र बोहरा, ॲड. छाया रामदास म्हात्रे, ॲड. आस्मिता नंदकिशोर भुवड यांनी आपले उमेदवारी अर्ज दाखल केले आहेत. या निवडणुकीत अध्यक्ष, उपाध्यक्ष, उपाध्यक्ष, सचिव, सहसचिव ( महिला राखीव), खजिनदार, ऑडिटर या पदांसाठी प्रत्येही दोन उमेदवार असल्याने यांच्यात सरळ लढत होणार असून सहखजिनदार पदासाठी तिहेरी लढत होणार आहे.

**Best Opportunity For**



- House Wife
- Retired
- Teacher
- Businessman

- We are fastest growing organization
- Work Fulltime or Part time as per your requirement
- No Target, No Investment
- Reward & Recognition
- Opportunity For Domestic & International Trip

Hurry Up Limited Seats

Provident Fund + Medical Benefits
Education: 12th pass to Graduates
Entry Age: 30 years to 65 years

Earn Fixed salary upto Rs.30,000/- & incentives upto 2 lakhs p.m.


₹

**Gauri gaikwad:8898632067**

# मलबार गोल्ड अँड डायमंड्सचा 'ब्राइड्स ऑफ इंडिया' अभियान; प्रार्थना बेहेरे, आलिया भट्ट, करीना कपूर खान अभियानात सामील

**दैनिक युवक आधार**

**मुंबई, वार्ताहर :** प्रत्येक भारतीय वधू तिच्यासोबत भावनांचे एक जग घेऊन जाते. त्यात तिच्या स्वतःच्या अनेक आठवणी असतात. ती ज्या रीतिरिवाजांना बघत मोठी झाली, ती ज्या संस्कृतीशी संबंधित आहे, ज्या आठवणी तिने हृदयाच्या जवळ जपल्या आहेत आणि तिच्या आयुष्यातील सर्वात महत्त्वाच्या दिवसांपैकी एकाची ओळख ठरतील असे दागिने, या सगळ्या गोष्टी त्यात असतात. जगातील सर्वात मोठ्या सोने आणि हिऱ्यांच्या रिटेल चेनपैकी एक असलेल्या मलबार गोल्ड अँड डायमंड्सने भारतातील समृद्ध, सांस्कृतिक वारशातील वधूच्या दागिन्यांचे महत्त्व फार पूर्वीपासून समजून घेतले आहे. वधूच्या श्रेणीतील दागिन्यांमध्ये मलबार गोल्ड अँड डायमंड्सने विचारपूर्वक क्युरेट तसेच विकसित केलेले डिझाइन एकत्र आणले आहेत. ज्यामुळे प्रत्येक वधूच्या परंपरांचा आदर करणारे शुद्धता, हेतू आणि कारागिरीने तयार केलेले दागिने सुनिश्चित होतात. वधूच्या कारागिरीतील सखोल कौशल्यासह, ब्रँडने देशभरातील



वधूंच्या विशिष्ट परंपरांचा आदर करणारे डिझाइन तयार करण्याचा एक अतुलनीय वारसा निर्माण केला आहे.

एक महत्त्वाचा टप्पा गाठत, मलबार गोल्ड अँड डायमंड्सने आज त्यांच्या प्रमुख ब्राइड्स ऑफ इंडिया अभियानाच्या 15व्या आवृत्तीचे अनावरण केले, जी भारतातील सर्वात मोठ्या आणि सर्वात अपेक्षित ब्राइडल प्रॉपर्टीपैकी एक म्हणून ओळखली जाते. या वर्षीच्या आवृत्तीत 22 वधू आणि 10 सेलिब्रिटी एकत्र आले आहेत - प्रार्थना बेहेरे, आलिया भट्ट, करीना कपूर खान, एनटीआर, कार्ती, अनिल कपूर, श्रीनिधी शेट्टी, रुक्मिणी मैत्र, सब्यसाची मिश्रा आणि मानसी पारेख, हे सर्व या मोहिमेचा विस्तार, वैविध्य तसेच भावनिक खोली दर्शवते. शुभजीत मुखर्जी यांनी संगीतबद्ध केलेल्या या जाहिरातीचे दिग्दर्शन अभिषेक वर्मन यांनी केले आहे. या जाहिरातीत भारताच्या वेगवेगळया भागातील वधू संस्कृतींचे सार टिपणारे तसेच प्रत्येक वधूच्या कथेला आकार देणाऱ्या विधि, भावना तसेच वारसा साजरे करणारे दृश्य आणि संगीतमय कथानक एकत्र आणले आहे.

श्री.एम.पी.अहमद, अध्यक्ष, मलबार गोल्ड अँड डायमंड्स म्हणाले,"दरवर्षी आयोजित करण्यात येत असलेला ब्राइड्स ऑफ इंडिया उपक्रम म्हणजे या देशातील वधूंप्रति आमची कृतज्ञता आहे. आणि हे 15वे वर्ष तर आमच्यासाठी एक महत्त्वाचा टप्पा आहे. स्वतःचे स्वातंत्र्य जपतानाच वधू परंपरेचा देखील कसा आदर करतात हे आम्ही अनेकदा अधोरेखित केले आहे. ही आवृत्ती त्या परंपरांची खोली दर्शवते - आठवणी, विधि आणि नातेसंबंध जे तिची ओळख आहे. पारदर्शकता आणि गुणवत्ता हमीसाठी मलबारची असलेली वचनबद्धता लक्षात घेता, प्रत्येक कुटुंबाला अर्थपूर्ण आणि विश्वासार्ह दागिने निवडण्याचा आत्मविश्वास वाटावा अशी आमची इच्छा आहे."

महाराष्ट्रीयन वधू शतकानुशतकांच्या जुन्या परंपरेला आधुनिकतेशी जोडते. खेळकर पण शांत, आनंद आणि गांभीर्य यांचे अनोखे मिश्रण त्यात दिसते. तिचा वारसा ती आत्मविश्वासाने पुढे नेत असते. मलबार गोल्ड अँड डायमंडचे दागिने तिच्या याच वेगळ्या व्यक्तिमत्त्वाचे प्रतिबिंब आहेत - तेजस्वी, भावपूर्ण आणि मराठी वधूच्या कालातीत ओळखीचा सन्मान करण्यासाठी डिझाइन केलेले.

प्रार्थना बेहेरे, सिने अभिनेत्री म्हणाली,"महाराष्ट्रीयन विवाह हे अर्थपूर्ण प्रतीकांनी परिभाषित केले जातात - नथ, मुंडावळ्या, हिरव्या बांगड्या, हे अलंकार आयुष्यातील एका नवीन अध्यायाचे प्रतीक आहेत. या तपशीलांमध्ये सांस्कृतिक अभिमान आहे. हे सगळे तपशील ब्राइड्स ऑफ इंडियामध्ये अगदी बारकाईने उतरतात, आपल्या परंपरांचे सार अधोरेखित करते आणि आजच्या वधूशी नैसर्गिकरित्या जोडले जाऊ शकतील अशा डिझाइन सादर करते."

आलिया भट्ट, सिने अभिनेत्री म्हणाली, "लग्नात प्रत्येक वधू स्वतःचे व्यक्तिमत्त्व जपण्याचा प्रयत्न करते, कोणतीही परंपरा तिच्या नजरेतून कशी दिसते, त्या पद्धतीने ती व्यक्त करते. ब्राइड्स ऑफ इंडिया याचेच प्रतिनिधित्व करते. दागिन्यांच्या माध्यमातून मलबार हेच सुंदरपणे टिपते जे अर्थपूर्ण, समकालीन आणि तिच्या स्वतःच्या कथेशी जोडलेले आहे, असे तिला वाटते."

करीना कपूर खान म्हणाली,"प्रत्येक वधू ज्या परंपरांसोबत वाढते त्याच परंपरा जपते आणि लग्नाच्या प्रत्येक विधितून आणि क्षणातून तो वारसा जिवंत करते. ब्राइड्स ऑफ इंडियाबद्दल मला जे आवडते ते म्हणजे, वधूला केंद्रस्थानी ठेवून मलबार या कथांना एका सांस्कृतिक छत्राखाली एकत्र आणते. या मोहिमेचा भाग असणे मला नेहमीच खास वाटले आहे कारण ते आपले मूळ विसरत नाहीत आणि प्रामाणिकपणा तसेच अभिजाततेने ते साजरे करतात."

दैनिक युवक आधार
हे पत्रक मालक, प्रकाशक भारती संतोष आमले तसेच मुद्रक करणसिंग प्रल्हादसिंग सिरसवाल यांनी सिद्धि प्रिंटर्स, मंगल नगर मलकापूर पिन ४४३१०१ जि बुलढाणा येथे छापून दैनिक युवक आधार मुख्य कार्यालय २०३ इंद्रप्रस्थ रेसिडेन्सी ग्रामपंचायत जवळ मु पो आदई ता. पनवेल जि रायगड ४१०२०६ येथून प्रकाशित केले आहे. संपादक भारती संतोष आमले.

daily YUVAK ADHAR
Printed by Karansingh Pralhadsingh Siraswal and published by Bharti Santosh Amle on behalf of Bharti Santosh Amle and printed at Siddhi Printers, MANGAL NAGAR MALKAPUR PIN 443101 DIST- BULDHANA. And Published at Head Office daily YUVAK ADHAR, INRAPRASTH SOCIETY, ? WING FLAT NO. 203-202 SERVE NO 28/1/ 3 PANVEL RAIGAD, ADAI PANVEL DIST- RAIGAD, Editor Bharti Santosh Amle

26 नोव्हेंबर संविधान दिना निमित्ताने सर्वांना हार्दिक शुभेच्छा.!

" वाट बिकट.. संविधान सभेची.!"

शोभलास तु , शिष्य ज्योतीबाचा ,
केलास अंगीकार तु, कबीर वचनांचा,
केलास उद्धार कोटी कोटींचा,
दाखवून मार्ग तथागतांचा . !

होते ठोकरलेले, अन पिचलेले,
भेदरलेले, अन कातावलेले,
समाजाच्या धुतकाराने,
तुझ्या जन्मा आधी भीमा,
नव्हती नरकमय, जगण्याला सीमा. !

किती विखुरले काटे तुझ्या मार्गात,
प्रवेशताना संविधान सभेत,
केली मंडलने करामत,
दिला बंगालचा हात हातात,
असता गनिम गर्वाच्या भ्रमात. !

नाही सहन झाले जातांध्याना,
अडकला घास गिळताना,
केली हिकमत दुर्जनांनी भारी,
लावली शक्ति पणाला सारी,
अवचित येता लक्ष्य टापूत,फाळणीचे दारी. !


दिले पाकिस्तानला, बंगालचे जिल्हे चार,
मोडूनी नियम फाळणीचे आरपार,
झाली कलुषित मने, समाधानाने थंडगार,
रद्द होताच सदस्यत्व, संविधान सभेचे,
बुडले दुःखात भीमराया, अपरंपार. !

जिगरबाज होता, नव्हता लेचापेचा,
सराव होता, अडथळयांच्या शर्यतीचा,
केला बहिष्कार संविधान सभेचा,
झाला जीव कासावीस इंग्रजांचा,
कारण तो एकमेव प्रतिनिधी होता,
उपेक्षितांचा, विस्थापितांचा,
देशातील तमाम गोर गरिबांचा . !

केली जागा मोकळी, त्याच्याचसाठी फक्त,
संविधानाचे काम दिन रात करुन, आटवले त्याने रक्त,
करन्या विस्थापितांना प्रस्थापित,
ठेवल्या राखीव जागा रिक्त,
महिलांच्या उत्थानासाठी नियम केले सक्त. !

म्हणुनच शोभलास,
शिष्य तु ज्योतिबाचा ,
केलास अंगीकार तु, कबीर वचनांचा,
केलास उद्धार कोटी कोटींचा,
देवूनी मार्ग तथागतांचा . !

अरुण निकम,
मुंबई.



# महाराष्ट्र मराठी मुक्त पत्रकार संघाची नवनिर्वाचित कार्यकारिणी जाहीर, प्रकाश पाटकर याची अध्यक्षपदी निवड

**दैनिक युवक आधार**

**मुंबई प्रतिनिधी गुरुनाथ तिरपणकर :** रौप्यमहोत्सवी वाटचाल करणाऱ्या महाराष्ट्र मराठी मुक्त पत्रकार संघाची द्विवार्षिक सर्व साधारण सभा रविवार दिनांक२३नोव्हेंबर२५रोजी बी.आर.दंडवते सभागृह, महाराष्ट्र हायस्कूल शेजारी,ना.म.जोशी मार्ग(डिलाईल रोड)करी रोड येथे मुक्त पत्रकार संघाच्या सभासदांच्या उपस्थितीत मोठ्या उत्साहात संपन्न झाली.सर्व प्रथम मुक्त पत्रकार संघाचे संस्थापक कै.अशोक शिवराम तोडणकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करुन व व्यासपीठावरील मान्यवरांच्या हस्ते दिपप्रज्वलन करुन सभेला सुरुवात करण्यात आली.त्यानंतर मागिल द्वीवार्षिक सभेचे इतिवृत्तांन वाचन छाया गचके यांनी केले.अहवाल व जमा खर्चाचे वाचन हिशोब तपासनीस एकनाथ नलावडे यांनी केले.जमा खर्चावर काही सदस्यांनी प्रश्न उपस्थित केले,त्यावर एकनाथ नलावडे यांनी उदारणासहीत, सकारात्मक सविस्तर उत्तर देऊन सदस्यांच्या प्रश्नांचे निराकरण केले.काही सदस्यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नांना अध्यक्ष प्रकाश पाटकर यांनी समर्पक उत्तरे देऊन त्यांचे समाधान केले.त्यानंतर निवडणूक निर्णय अधिकारी ॲड.सोपानराव बुडबाडकर यांच्या मार्गदर्शनाखाली



२०२५ते२०२९या पाच वर्षांसाठी नवीन कार्यकारिणीची सर्व सभासदांच्या सहमतीने निवड करण्यात आली.निरक्षक म्हणून लवु कुमार तावडे यांनी काम पाहिले.नविन कार्यकारिणी- अध्यक्ष प्रकाश वसंत पाटकर, उपाध्यक्ष-ॲड.सुनिल भार्गवराम शिर्के, प्रमुख कार्यवाह-अशोक विठ्ठल भोसले, संयुक्त कार्यवाह-डॉ.सूर्यभान श्रीराम डोंगरे, संयुक्त कार्यवाह-शशिकांत राजाराम सावंत, खजिनदार-श्रीमती छाया सिताराम गचके, हिशेब तपासनीस-डॉ.एकनाथ ज्ञानदेव नलावडे.कार्यकारी सदस्य- विश्वनाथ मारुती जगदाळे, महेश्वर भिकाजी तेटांबे,संजय शंकर कांबळे, अण्णासाहेब एकनाथ आहेर, अशोक फकीरा लांडगे,पंकजकुमार ध्रुव पाटील, ज्ञानेश्वर कृष्णा कोरगावकर, रविंद्र दिगंबर नानचे.तसेच सल्लागार म्हणून प्रभाकर शिवराम तोडणकर, पंढरीनाथ भीमजी तामोरे, जगन्नाथ गोपाल कामत, गुरुनाथ मधूसुदन तिरपणकर,अनिल सखाराम पंडित यांची निवड करण्यात आली.यावळी काही सदस्यांची मार्गदर्शनपर भाषणे झाली.पाच वर्षाची कार्यकारिणी व वयाची मर्यादा यासाठी घटनेत बदल करण्यात यावा यासंदर्भात सर्व सदस्यांच्या सहमतीने ठराव मंजूर करण्यात आला.व्यासपीठावरील संघाचे अध्यक्ष प्रकाश पाटकर, निवडणूक निर्णय अधिकारी सोपानराव बुरबाडकर, निरीक्षक लवु कुमार तावडे यांच्या हस्ते सर्व पदाधिकाऱ्यांना पुष्पगुच्छ प्रदान करुन त्यांचे अभिनंदन करुन भावी वाटचालीस शुभेच्छा देण्यात आल्या.संपूर्ण द्विवार्षिक सभेचे सुत्रसंचलन सूर्यभान डोंगरे यांनी केले.सभा खेळीमेळीच्या वातावरणात पार पाडली.शेवटी अल्पोपहार करुन राष्ट्रगीताने सभेची सांगता झाली.

# शेतपिक व फळपिकांच्या नुकसानीचा निधी; लाभार्थ्यांच्या थेट बँक खात्यात

**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी राकेश यादव वाडी नागपूर :** खरीप 2025 जून ते सप्टेंबर या कालावधीमध्ये अतिवृष्टी, पूर व सततचा पाऊस या नैसर्गिक आपत्तीमुळे नागपूर जिल्ह्यातील एकूण 1 लाख 12 हजार 914 शेतकऱ्यांचे 92817.39 हे. आर शेतपिकांचे व फळपिकांचे व जमिनीचे नुकसान झाले. या अनुषंगाने एकूण 119.54 कोटी रुपयांच्या निधीची शासनाकडे मागणी करण्यात आली होती. यापैकी जून ते ऑगस्ट या कालावधीत झालेल्या नुकसानाची मदत रक्कम 4.89 कोटी रुपये प्राप्त झाले. शासन स्तरावरून हा निधी लाभार्थ्यांच्या थेट बँक खात्यात वितरीत करण्यात आला आहे.माहे सप्टेंबर-2025 या कालावधीतील 87169.38 हे. आर क्षेत्रावरील 1 लाख 3 हजार 871 शेतकऱ्यांच्या 114.64 कोटी रुपये इतका निधी शासनाकडून प्राप्त झाला आहे. यातील 100.77 कोटी रक्कम (87.90%) वाटप करण्यात आलेली असून शिल्लक वाटपाची कार्यवाही सुरु आहे. काही शेतकऱ्यांनी ई-केवायसी न केल्यामुळे तसेच ॲग्रीस्टकमध्ये नोंदणी न केल्यामुळे वाटपासाठी अडचण निर्माण होत आहे. ज्या शेतकऱ्यांनी अद्याप पावेतो ॲग्रीस्टॅक मध्ये नोंदणी केलेली नाही त्यांनी आपली नोंदणी करून फार्मर आयडी प्राप्त करून घ्यावेत. तसेच ज्या शेतकऱ्यांचे खात्यात अद्यापपावेतो शेत पिकाचे नुकसानीबाबत निधी जमा झाला नाही, त्यांनी आपले जवळच्या आपले सरकार सेवा केंद्रात जाऊन आपली ई-केवायसीची प्रक्रिया पूर्ण करावी असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ विपीन इटनकर यांनी केले आहे. जेणेकरून आपल्या खात्यात निधीची रक्कम जमा होण्यास अडचण निर्माण होणार नाही, असे त्यांनी प्रसिद्धी पत्रकान्वये कळविले आहे.

# अवैध वाळू वाहतूक: मंठ्यात तहसीलदारांची कारवाई; टेम्पो जप्त

**दैनिक युवक आधार**

**उपसंपादक महाराष्ट्र:-राजु शिंदे.**

(ता.२५): मंठा तालुक्यातील भुवन–वझर सरकटे परिसरातून अवैधरीत्या दोन ब्रास वाळू उत्खनन करून शिवनगिरी–बेलोरा मार्गे वाहतूक करणारा टेम्पो तहसील प्रशासनाने शुक्रवारी सकाळी रंगेहात पकडला. परतुरचे उपविभागीय अधिकारी पद्माकर गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली तहसीलदार सुमन मोरे यांनी ही कारवाई केली.



वझर सरकटे येथील शिवहरी परमेश्वर सरकटे यांच्या मालकीचा टेम्पो (क्र. MH-21-BH-7972) वाळूसह ताब्यात घेण्यात आला असून पुढील तपासासाठी तो सेवली पोलीस ठाण्यातील पोलीस हेड कॉन्स्टेबल एस. पी. राठोड यांच्या ताब्यात सुपूर्द करण्यात आला आहे.

या कारवाईबाबत तहसीलदार सुमन मोरे म्हणाल्या की,"पुर्णा नदीकाठच्या गावांत सुरू असलेल्या अवैध वाळू उत्खननावर कठोर पावले उचलली जात आहेत. उत्खननासाठी वापरली जाणारी किन्ही व नायलॉन दोरी, वाहतूक करणारे टेम्पो , वाळू साठे जप्ती तसेच वाळू वाहतुकीचे रस्ते खोदण्याची मोहीम सुरू आहे."

अवैध उत्खननावर नियंत्रण आणण्यासाठी तालुका प्रशासनाकडून पुढीलही धडक कारवाई केली जाणार असल्याचे संकेत मिळाले आहेत.

# शिक्षणाच्या गुणवत्तेसाठी पालकांची साथ सर्वात महत्त्वाची – प्राचार्य कोलते

**दैनिक युवक आधार**

**सोयगाव प्रतिनिधी विजय काळे**

**सोयगाव:-** तालुक्यातील सावळदबारा जय कालंका देवी शिक्षण प्रसारक संस्था संचलित छत्रपती शिवाजी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय व कै.लक्ष्मण भीमराव कोलते पाटील वरिष्ठ महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने पालक मेळावा उत्साहात पार पडला.संस्थेचे अध्यक्ष भाऊराव लक्ष्मणराव कोलते यांच्या अध्यक्षतेखाली संस्थेच्या सभागृहात हा कार्यक्रम संपन्न झाला. पालक मेळाव्याचे उद्घाटन संस्थेचे सहसचिव व प्राचार्य नारायण कोलते यांनी केले. प्रमुख पाहुणे म्हणून मनोहर जमाले,भास्कर सपाटे,रामचंद्र चिमणकर व पत्रकार जब्बार तडवी उपस्थित होते.प्रा. पंजाबराव शेळके यांनी पालक मेळाव्याचे महत्त्व स्पष्ट केले.विद्यार्थी हा शिक्षक व पालक यांना जोडणारा दुवा आहे.त्यामुळे त्याच्या शैक्षणिक,सामाजिक व बौद्धिक प्रगतीचा आढावा घेण्यासाठी पालकांनी




शाळेशी संपर्कात राहणे आवश्यक असल्याचे प्राचार्य कोलते यांनी मार्गदर्शनात नमूद केले.विद्यार्थ्यांच्या सुरक्षेसाठी सुरक्षा समिती,दक्षता समिती मार्फत शाळा सातत्याने लक्ष ठेवत असल्याची माहिती देण्यात आली.तसेच जिल्हाधिकारी छत्रपती संभाजीनगर यांनी गुणवत्तापूर्ण शिक्षणासाठी दिलेल्या 'दशसूत्री कार्यक्रमा'वरही चर्चा करण्यात आली.या पालक मेळाव्याच्या आयोजनात विकास पाटील, भूषण देसले,जीवन कोलते, श्याम जाधव व अजबराव चव्हाण यांनी विशेष मेहनत घेतली.आभार प्रदर्शन डॉ. प्रवीण सरकटे यांनी मानले.

# कृषी विभागाच्या "महाविस्तार Ai" ॲपचा शेतकरी बांधवांनी वापर वाढवावा : ओंकार शेळके

## गुगल प्ले स्टोअरवरून अँप डाऊनलोड करण्याचे आवाहन...

**दैनिक युवक आधार**

**पाटोदा (प्रतिनिधी) :** कृषी विभागाचा अत्याधुनिक "महाविस्तार Ai"ॲपचा पाटोदा तालुक्यातील सर्व शेतकरी बांधवांनी मोठ्या प्रमाणात वापर वाढवावा असे आवाहन पाटोदा तालुका कृषी अधिकारी श्री.ओंकार शेळके यांनी केले आहे. तालुका कृषी अधिकारी श्री.ओंकार शेळके यांनी तालुक्यातील शेतकऱ्यांना संदेश देताना सांगितले की तालुक्यातील सर्व शेतकऱ्यांनी अत्याधुनिक 'महाविस्तार AI' मोबाईल ॲपचा मोठ्या प्रमाणात लाभ घ्यावा. तालुका कृषि अधिकारी श्री.ओंकार शेळके पुढे म्हणाले की या 'महाविस्तार AI'ॲप मुळे पेरणी, खते, सिंचन, पिक संरक्षण, कीड-रोग नियंत्रण, बाजार भाव, हवामान आणि कृषी योजना यांची माहिती, तज्ज्ञांचा सल्ला, तसेच फोटोद्वारे त्वरित पीक निदान मिळण्याचे फायदे शेतकऱ्यांना मिळणार आहेत. तालुक्यातील




अधिकाधिक शेतकऱ्यांनी गुगल प्ले स्टोअरवरून 'महाविस्तार AI' ॲप त्वरित डाऊनलोड करून वापर करावा असे आवाहन केले आहे. आपणास डिजिटल शेतीकडे वाटचाल करत असताना उत्पादन वाढ व शाश्वत शेती साध्य करण्यासाठी हे ॲप उपयोगी ठरेल, असा विश्वास ही या वेळी पाटोदा तालुका कृषी अधिकारी श्री.ओंकार शेळके यांनी व्यक्त केला आहे.

# संविधान एक चिंतन बॅरिस्टर - डॉ.बाबासाहेब आंबेडकर

डॉ. बाबासाहेब आंबेडकर याचं एक सुंदर वाक्य मला नेहमी आठवत की "संविधान कितीही चांगले असले, तरी त्याची अंमलबजावणी करणारे चांगले नसतील, तर ते वाईटच ठरेल. संविधान कितीही वाईट असले, तरी त्याची अंमलबजावणी करणारे चांगले असतील, तर ते चांगलेच असल्याचे सिद्ध होईल," आज दि. २६ नोव्हेंबर. दरवर्षी हा दिवस 'संविधान दिन' किंवा 'राष्ट्रीय विधी दिन' म्हणूनही देशभरात साजरा केला जातो.९ डिसेंबर, १९४६ रोजी घटना समितीची पहिली आणि २५ नोव्हेंबर, १९४९ रोजी शेवटची मीटिंग झाली. २६ नोव्हेंबर, १९४९ रोजी देशाने अधिकृतपणे राज्यघटनेचा स्वीकार केला. म्हणून २६ नोव्हेंबर हा दिवस अलीकडे 'संविधान दिन' म्हणून साजरा केला जातो. त्यानिमित्ताने भारतीय राज्यघटनेला कृतज्ञतापूर्वक अभिवादन करणे हे प्रत्येक भारतीयाचे कर्तव्य आहे.-डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या नेतृत्वाखाली भारतीय संविधानाच्या निर्मितीसाठी मसुदा समितीने सादर केलेला अंतिम मसुदा संविधान सभेने स्वीकारला. त्यानिमित्ताने संविधान साक्षरता, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे संविधान चिंतन आणि नागरिकांचे मूलभूत अधिकार यांचे महत्त्व अधोरेखित करणारा ( संविधान एक चिंतन बॅरिस्टर - डॉ.बाबासाहेब आंबेडकर ) हा विशेष अर्पण लेख.

भारतीय राज्यघटनेचे थोर शिल्पकार विश्वरत्न बॅरिस्टर -डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे महान द्रष्टे नेते आणि हजारो वर्ष गुलामगिरीत असलेल्या अस्पृश्य गुलाम मानलेल्या समाजाला अंधकारातून प्रकाशात आणण्याचे काम या युगपुरुषाने केले होते.समाजातील उपेक्षित, वंचित घटकांना न्याय देण्यासाठी आणि समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी त्यांनी घेतलेले कार्य अद्वितीय असेच. अत्यंत कठीण परिस्थितीचा सामना करीत त्यांनी देशात व परदेशात शिक्षण घेतले व आपल्या प्रचंड बुद्धिमत्तेचा ठसा त्यांनी परदेशातील शिक्षण संस्थांवर उमटवला. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी देशाच्या सर्वांगीण विकासासाठी विविध क्षेत्रांत प्रचंड योगदान दिले. आधुनिक भारताला त्यांची सर्वात मोठी देणगी म्हणजे 'भारतीय राज्यघटना.' जगातील श्रेष्ठ घटनांमध्ये आपल्या देशाच्या घटनेचा समावेश होतो. समता, बंधुभाव आणि न्याय ही तत्त्वे आपल्या घटनेचा भक्कम पाया आहेत. भारतीय संविधानामुळे देशाला लोकशाही व्यवस्था मिळाली. समाजातील उपेक्षित आणि वंचित घटकांना विकास आणि प्रगती साध्य करण्यासाठी समान संधी राज्यघटनेने दिली. आपल्या देशाचे अखंडत्व आणि एकता टिकून ठेवण्याच्या संदर्भात भारतीय राज्यघटनेचे फार मोठे योगदान आहे, ही गोष्ट कोणालाही नाकारता येणार नाही. राज्यघटनेने देशातील सर्व नागरिकांना मूलभूत हक्क आणि न्यायाची हमी दिली. आपली राज्यघटना मानवी मूल्याचा पुरस्कार करणारी आहे. म्हणून आपल्या देशाची राज्यघटना ही सर्वश्रेष्ठ आहे.डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे एक श्रेष्ठ संविधानतज्ज्ञ होते. त्यांनी ६० पेक्षा जास्त देशांच्या राज्यघटनेचा अभ्यास केला होता. जगातील कोणत्याही राजघटनेत तरतूद नसलेली कलमे, म्हणजे मूलभूत हक्काची कलम १४ ते ३२ आपल्या संविधानाने बहाल केले. 'कलम ३२'ला तर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी भारतीय राज्यघटनेचे हृदय म्हटलेले आहे. कारण, या कलमाद्वारे आपल्या हक्कांवर कोणीही गदा आणत असेल, तर आपल्याला सर्वोच्च न्यायालयात दाद मागता येते. प्रत्येक नागरिकाला जगण्याचा मूलभूत हक्क दिला आहे. मग ती व्यक्ती कोणत्याही धर्माची, पंथाची, जातीची असो. त्यांना लोकशाहीप्रधान जीवन बहाल केले आहे. स्त्री-पुरुषांना समान अधिकार मिळवून दिला. म्हणूनच महिला आज मुख्यमंत्री, राज्यपाल, न्यायाधीश, लोकसभा अध्यक्ष, पंतप्रधान, राष्ट्रपती उच्चपदावर पोहोचत आहेत. हे केवळ संविधानामुळेच शक्य झाले आहे. आपल्या देशात कायद्याचे राज्य आहे. कायद्यापुढे सर्व नागरिक समान आहेत. भारतीय राज्यघटनेने उगमस्थान भारतीय जनताच आहे. 'एक व्यक्ती, एक मतआणि एक मूल्य' हे तत्त्व आपल्या राजघटनेने स्वीकारलेले आहे. दि. ९ डिसेंबर १९४६ रोजी संविधान सभेने राज्यघटना निर्मितीच्या कार्याची सुरुवात केली. संविधान सभेचे अध्यक्ष डॉ. राजेंद्र प्रसाद होते. काँग्रेसच्या विरोधामुळे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी मुंबई विधिमंडळातून म्हणजेच जैसूर आणि खुलना येथून निवडणूक लढवून जोगेंद्रनाथ मंडळ आणि शेड्यूल कास्ट फेडरेशन सदस्यमार्फत दि. १७ डिसेंबर १९४६ रोजी संविधान सभेत सदस्य म्हणून प्रवेश केला. फाळणी पूर्वीची घटना समितीची सदस्य संख्या ३८९ होती, तर फाळणी नंतरची घटना समितीची सदस्य संख्या २९९ होती. दि. २५ नोव्हेंबर १९४९ रोजी घटना समितीने मसुदा सादर केला. मसुदा घटनेची चर्चा ११ सत्रांत केली गेली. यात संविधान सभेचे ११४ दिवस खर्च झाले. खरे पाहता, घटना समितीचे कार्य एकूण १४१ दिवस चालले. दि. २९ ऑगस्ट १९४७ रोजी मसुदा समितीची 'ड्राफ्टिंग कमिटी' स्थापन करण्यात आली. या मसुदा समितीची सटा संख्या सात होती. या प्रारूप समितीच्याच अध्यक्ष डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची निवड झाली. -डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे देशाच्या सर्वांगीण विकासामध्ये विशेष योगदान आहे. संविधानाची स्थापना झाल्यापासून ते घटना समितीने मसुदा सुपुर्द करेपर्यंतचा कालावधी बघितला, तर २ वर्षे ११ महिने १८ दिवस म्हणजेच १ हजार, ८२ दिवस इतका कालावधी संविधान निर्मितीला लागला. भारतीय राज्यघटना तयार करण्यासाठी ६३ लाख, ९६ हजार, ७२९ रुपये, ५० पैसे एवढा खर्च झाला. भारतीय मूळ राज्यघटनेमध्ये एकूण कलमे ३९५, आठ परिशिष्टे व २२ विभाग आहेत. सध्या परिस्थितीनुसार त्या कलमांमध्ये व परिशिष्टांमध्ये बदल होत आहेत. घटनेचा मसुदा संविधान सभेस सादर केल्यानंतर दि. ४ नोव्हेंबर १९४७ते २६ नोव्हेंबर १९४९ या कालखंडात एकंदरात १० हजार, ६३५ दुरुस्त्या समितीला सूचविल्या गेल्या. त्यापैकी २ हजार, ७७३ दुरुस्त्यांवर विचार करण्यातआला. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी राज्यघटनेचा सुधारित मसुदा दि. ४ नोव्हेंबर १९४८ रोजी घटना परिषदेला सादर केला. हामसुदा घटना परिषदेने मंजूर करावा, असा ठराव डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी मांडला. या ठरावाच्या अनुषंगाने डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी जे भाषण केले होते, त्यात त्यांनी संसदीय लोकशाही आणि अध्यक्षीय पद्धतीवर आधारित लोकशाही यावर भाष्य केले. संसदीय लोकशाहीचे वेगळेपण नेमके कशात आहे, अमेरिकेच्या अध्यक्षीय लोकशाहीपेक्षा आपली संसदीय लोकशाही कशी वेगळी असणार आहे, यावर त्यांनी प्रकाश टाकला आहे. दि. २६ नोव्हेंबर १९४९ रोजी भारताची राज्यघटना स्वीकृत करण्यात आली आणि दि. २६ जानेवारी १९५० रोजी भारताची राज्यघटना ही राज्य आणि केंद्रशासित प्रदेशाचा कायदा म्हणून कार्यरत झाली. अर्थात, राज्यघटनेची अंमलबजावणी करण्यास सुरुवात झाली. जानेवारी १९५० पासून भारतीय गणराज्याची वाटचाल सुरू झाली. मात्र, संविधान खऱ्या अर्थाने प्रामाणिकपणे अंमलबजावणी होणे,ही काळाची गरज आहे. अमेरिकेतील कोलंबिया विद्यापीठाने एक अहवाल तयार केला की, विद्यापीठातून २०० वर्षांत शिकून गेलेल्या सर्वात विद्वानात विद्वान कोण? ज्यात जाहीर केलेल्या यादीत डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे पहिल्या क्रमांकावर आहेत व कोलंबिया विद्यापीठात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना ब्राँझ धातूचा पुतळा बसवण्यात आला आहे आणि त्याखाली 'द सिम्बॉल ऑफ नॉलेज' अर्थात 'ज्ञानाचे प्रतीक' म्हणजेच 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर' असे लिहिलेले आहे.जगातील सर्वात मोठी लोकशाही लिखित व सर्वोत्कृष्ट अशी राज्यघटना म्हणजे भारतीय संविधान. भारतीय संविधान जगात अनमोल ठरले आहे. मात्र, भारतीय संविधानाची अंमलबजावणी जी घटनाकारांना अपेक्षित होती, त्या प्रमाणात होत नाही, म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी भारतीय संविधानबद्दल सूचक असे वक्तव्य केले आहेत. त्याच वेळेस काही इशारेदेखील दिले आहेत. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी असे म्हटले होते की, "घटना कितीही चांगली असली तरी राबवणारे लोक जर वाईट असतील, तर त्या घटनेचा उपयोग होणार नाही." त्यामुळे भारतीय संविधानाची अंमलबजावणी जोपर्यंत प्रामाणिकपणे होणार नाही, तोपर्यंत आपण महासत्ता विकसित होणार नाही आणि सामान्य माणूस सामान्य राहील. श्रीमंत व्यक्ती अधि श्रीमंत होत राहील व कालांतराने सामाजिक, आ राजकीय व सांस्कृतिकदृष्ट्या पराकोटीची विषमतामाजेल, म्हणून संविधानाची चांगल्या पद्धतीने अंमलबजावणी होणे अत्यंत महत्त्वाचे आहे. अशा या महामानवाला कोटी कोटी प्रणाम.

**लेखक,विद्रोही,कवी,**
**प्रकाश नंदकुमार निकाळे**
**क्रांतिभूमी विंचूर**

## थोडक्यात

### समीक्षा फोले अनेक खेळाचे गाजवीत आहे मैदान



**दैनिक युवक आधार**
**तालुका प्रतिनिधी विजय खुडे**

**कळमनुरी -** नॅशनल स्पोर्ट अर्थोरिटी ऑफ इंडिया द्वारा हिंगोली जिल्हास्तरीय गोळा फेक मध्ये समीक्षा आत्माराम फोले ही जिल्यातुन तृतीय आली असून तिचे सर्वत्र कौतुक होत आहे. समीक्षा ही नरवाडी ता कळमनुरी यां आदिवासी बहुल गावातील असून खेळाच्या सुविधा नसलेल्या गावात राहून सुद्धा समीक्षा हिने स्वतःच्या आवडीवर तिने तयारी करत. यां आधी सुद्धा प्रत्येक खेळात अव्हल येत राहिली असून तिने या पूर्वी डॉजबोल या स्पर्धेत जिल्हास्तरीय उत्कृष्ट कामगिरी करत विजेते पद पटकाविले आहे. व विभागीय स्तरावर हॉलिबॉल स्पर्धेत उत्कृष्ट कामगिरी केली असून. कबड्डी स्पर्धेत राज्यस्तरीय मनमाड यां ठिकाणी झालेल्या स्पर्धेत भाग हा जिल्ह्यातून समीक्षा ची निवड करून तिने त्या राज्यस्तरीय मैदान गाजविले असून त्या ठिकाणी सुद्धा विजेते पद आणले असून तिने अनेक स्पर्धेत भाग घेण्याचे धाडस करून पारितोषिक मिळवणे हे सर्वांना आदर्श घेण्यासारखं आहे. समीक्षा चे सर्वत्र कौतुक होत आहे.

### मुदगल – कुंभारी कालवा दुरुस्तीकडे पाटबंधारे विभागाचे दुर्लक्ष? काटेरी झुडपाने हारवले कालवे

**दैनिक युवक आधार**

**तालुका प्रतिनिधी अशोक नवघरे :** तालुक्यातील मुदगल कुंभारी या कालव्याकडे पाटबंधारे विभागाचे दुर्लक्ष कुंभारी कालवा मुदगल येथे येणाऱ्या कालव्यात मोठं मोठी काटेरी झुडपाने या कालव्यास वेढलेले असून या मुदगल येथे जाणारा कालवा दुरुस्तीकडे पाटबंधारे विभागाने तात्काळ लक्ष देऊन आता येणाऱ्या रब्बी हंगामासाठी उपयोगी यावे अशी शेतकऱ्यांची अपेक्षा होती मात्र पाटबंधारे विभागाचे नियोजन नसल्याने शेतकऱ्यांना कधीच या पाण्याचा लाभ होत नाही कुंभारी मुदगल येथील कालव्याची दयनीय अवस्था झाली असून अतिवृष्टीच्या काळात तर कालवा अनेक ठिकाणी फुटला आहे कालव्याची दुरुस्ती करून शेतकऱ्यांना रब्बी हंगामासाठी पाणी देणे गरजेचे होते मात्र याकडे पाटबंधारे विभागाचे दुर्लक्ष दिसून येत आहे तरी या कुंभारी मुदगल कालव्याची दुरुस्ती करून शेवटच्या शेतकऱ्यांपर्यंत पाणी पोहोचविण्याची मागणी शेतकरी वर्गातून होत आहे




**पनवेल पंचायत समितीच्या माजी सभापती देवकीबाई कातकरी यांचे नुकताच निधन झाले. सदरचे वृत्त कळल्याने माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, ज्येष्ठ नेते वाय. टी. देशमुख यांनी कोंबडभुजे येथे जाऊन श्रद्धांजली अर्पण केली. यावेळी शैलेष भगत, निलेश खारकर, वितेश म्हात्रे श्री. पिल्ले, बाळाराम पाटील पंढरीनाथ भगत, देवराम भगत, अंकुश पाटील, विजय भोईर, चंद्रकांत भगत, आर. एस. कोळी, गुरुनाथ भगत, सूरज भगत, सचिन भगत, चेतन मढवी, अशोक भगत आदी उपस्थित होते.**

**( दैनिक युवक आधार)**

### जासई हायस्कूल ला अंगणवाडी शाळेची भेट



**दैनिक युवक आधार**

**जिल्हा प्रतिनिधी प्रमुख एम.डी.भोईर :** रयत शिक्षण संस्थेचे, श्री छत्रपती शिवाजी हायस्कूल व लोकनेते दि बा पाटील जुनियर कॉलेज जासई, या विद्यालयात गुरुवार दिनांक २०/११/२०२५ या दिवशी United way Mumbai, यांच्या माध्यमातून अंगणवाडी क्रमांक 4 जासई येथील अंगणवाडीतील एकूण १८ विद्यार्थ्यांना जासई हायस्कूलमध्ये राबवण्यात येणारे आनंददायी उपक्रम दाखविण्यात आले. या विद्यार्थ्यांसोबत Salma shekh _visit sevika Shraddha Patil _Facilatar _UWM, Aruna Sawant _UWM_project associate तसेच आमच्या विद्यालयाच्या कर्तव्यदक्ष मा मुख्याध्यापिका सौ म्हात्रे के जी मॅडम ,माननीय पर्यवेक्षिका सौ मुकादम मॅडम, उपशिक्षिका सौ ठाकूर एस एस तसेच संगणक शिक्षिका कांबळे अश्विनी उपस्थित होत्या,संगणक शिक्षिका अश्विनी कांबळे हिने सर्व विद्यार्थ्यांना संगणक लॅब दाखवली डिजिटल बोर्ड यू ट्युब वर काही गोष्टी दाखविल्या त्या सर्व मुलांना खूप आवडले सर्व विद्यार्थ्यांना वर्ग दाखविले शाळेतील विद्यार्थी दाखवले त्यानंतर विद्यालयाचे ग्रंथालय दाखवले.शेवटी आलेल्या पाहुण्यांनी शाळेचे व मुख्याध्यापकांचे आभार मानून निरोप घेतला.

# आक्षेपांसाठी २१ दिवसांचा कालावधी द्या किंवा निवडणूक रद्द करा!;

## 'मतदार यादीतील 'घोळा' विरोधात ठाकरे बंधूंचा निवडणूक आयोगावर हल्लाबोल

**दैनिक युवक आधार**

**मुंबई :** बृहन्मुंबई महानगरपालिका (बीएमसी) निवडणुकीच्या तोंडावर आल्या असताना मतदार यादीतील 'गोंधळाच्या भोवऱ्यात' अडकलेल्या राज्य निवडणूक आयोगावर ठाकरे बंधू राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे यांनी कडाक्याची टीका केली आहे. "निवडणूक आयोग स्वायत्त यंत्रणा म्हणतो, मग स्वायत्तता दाखवा! अन्यथा आक्षेपांसाठी २१ दिवसांचा कालावधी द्या किंवा निवडणूक रद्द करून पुन्हा सुरळीत प्रक्रिया राबवा," असा इशारा देऊन त्यांनी राज्य निवडणूक आयुक्त दिनेश वाघमारे यांना पत्र दिले.

मनसे प्रमुख राज ठाकरेंच्या पत्रात निवडणूक आयोगाच्या कामकाजावर सडकून टीका करण्यात आली. "आयोगाने शेवटची मतदार यादी ३० ऑक्टोबर २०२४ रोजी प्रकाशित केली, पण त्यानंतर १३ महिने काहीच झाले नाही. नियमाप्रमाणे जानेवारीत नवीन यादी आणि दर तीन महिन्यांनी सुधारित यादी प्रसिद्ध करायची, पण ते झाले नाही. हे हेतुपुरस्सर आहे का? कारण काय?" असा सवाल ठाकरे यांनी उपस्थित केला. संकेतस्थळावर प्रसिद्ध केलेल्या नवीन नोंदी, वगळलेली नावे यातही 'नाव, पत्ता, लिंग' यांचा तपशील नसल्याचा आरोप करत, "हे फक्त औपचारिकता आहे का?" असा सवाल केला.

पत्रात पुढे म्हटले, "सर्वपक्षीय शिष्टमंडळाला निवडणूक अधिकारी चोकलिंगम यांनी त्रुटी नसतील असे आश्वासन दिले होते, पण प्रत्यक्षात काय झाले? निवडणुकीसाठी यादी ६ नोव्हेंबरऐवजी २० नोव्हेंबरला प्रसिद्ध केली, आणि आक्षेपांसाठी फक्त ८ दिवस दिले. ही सदोष यादी PDF फॉरमॅटमध्ये का नाही? एआयच्या युगात आयोगाची 'जनरल बुद्धिमत्ता' कुठे?"



**'मतदार संघांमध्ये 'पळापळ', दुबारिक १० लाख!**

ठाकरे यांनी यादीतील तांत्रिक चुका उघड केल्या: "एका वॉर्डमधील मतदार दुसऱ्या वॉर्डमध्ये टाकले गेले, नकाशाबाहेरील इमारतींचे मतदार त्या वॉर्डमध्ये दाखवले. सत्ताधारी पक्ष उमेदवार 'पळवत' आहेत, आता मतदारांना 'पंथ' पहनायला शिकवताय का?" असा टोला लगावला. आक्षेप प्रक्रिया किचकट असल्याचे सांगत, "आम्ही चुका दाखवतो, तेव्हा आधारकार्ड किंवा पुरावा मागितला जातो. आयोगाने पूर्वी मान्य केले की १० लाख दुबारिकृत मतदार आहेत. त्यांना शोधून वगळण्यासाठी ८ दिवस कसे पुरतील? किमान २१ दिवस हवेत. सर्व पक्षांना एकत्रित आक्षेपाची मुभा द्यावी."

**ठाकरे गटाची एकजूट: भेटी, पत्र आणि 'शिवालय'चा सल्ला मसलत**

शिवसेना (उबाठा) नेते आमदार आदित्य ठाकरे, विधान परिषदेतील विरोधी पक्षनेते अंबादास दानवे, आमदार अनिल परब आणि मनसे नेते बाळासाहेब नांदगावकर यांनी आयुक्तांची भेट घेऊन गाऱ्हाणे मांडले. राज ठाकरेंचं पत्रही सादर केले. शिवाजी पार्क येथील 'शिवालय'वर झालेल्या पत्रकार परिषदेत आदित्य ठाकरे म्हणाले, "आयोगाने ५ डिसेंबरला अंतिम यादी प्रसिद्ध करणार आहे, पण जनतेला माहित आहे की तुम्ही प्रामाणिक नाही. स्वायत्तता दाखवा, अन्यथा महाराष्ट्राची लोकशाही धोक्यात येईल."

उद्धव ठाकरे यांनी पत्रात भावनिक आवाहन केले: "आयोगाचे अधिकारीही महाराष्ट्राचे नागरिक आहेत. आज सत्ताधाऱ्यांच्या मागे घरंगळत जाता, उद्या ते तुमच्या नरडीला नख लावतील. सद्विवेक बुद्धी वापरा, पाठीचा कणा ताठ ठेवा. महाराष्ट्र जनता तुमची शतशः ऋणी राहील."राज्यात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांना वेग आला असून, २ डिसेंबरला मतदान आणि जानेवारीत मुंबईसह इतर महापालिका निवडणुका नियोजित आहेत. त्यामुळे सदोष निवडणूक प्रक्रियेविरोधात ठाकरे गटाने सर्व पक्षांना एकत्र येण्याचे आवाहन केले आहे.

## चुकीचं काम करणाऱ्याचा सत्यानाश होवो!" – भरत गोगावले यांचा इशारा;

### बहुमत दिल्यास महाडसारखा विकास श्रीवर्धनला देण्याचे आश्वासन

**दैनिक युवक आधार**

**श्रीवर्धन तालुका प्रतिनिधी अनिकेत मोहित :** श्रीवर्धन नगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर शिवसेनेचे आमदार भरत गोगावले यांच्या वक्तव्याने राजकीय वातावरण चांगलंच तापलं आहे. शिवसेना उमेदवारांची भेट घेताना त्यांनी राष्ट्रवादीचे माजी आमदार अनिकेत तटकरे यांच्या विधानावर थेट प्रतिक्रिया देत जोरदार टीका केली. गोगावले म्हणाले, आम्ही जर यांच्या विरोधात काम केलं असेल तर आम्हाला शिक्षा मिळो. पण ज्यांनी विधानसभेला आमच्या विरोधात काम केलं, त्यांना धडा शिकवण्यासाठी मी हरिहरेश्वरमध्ये नवस करतो. ज्याने कुणी चुकीचं काम केलं असेल त्याचा सत्यानाश होवो, त्याचं वाटोळं होऊ दे. याचबरोबर त्यांनी आगामी नगरपरिषदेच्या निवडणुकीत शिवसेनेला बहुमत देण्याचे आवाहन करत विकासाबाबत स्पष्ट आश्वासन दिलं. गोगावले म्हणाले, नगरपालिका



निवडणुकीत आम्हाला बहुमत द्या. महाडमध्ये जसा विकास केला, तसाच सर्वसमावेशक आणि जलद विकास श्रीवर्धनमध्ये करू. पालकमंत्रीपदाचा तिढा सध्या आहे,

पण जिल्हापरिषद आणि ग्रामपंचायत निवडणुकीनंतर हा प्रश्न सुटण्याची शक्यता आहे. गोगावले यांच्या या आक्रमक आणि ठाम भूमिकेमुळे कार्यकर्त्यांमध्ये उत्साह वाढला.या दौऱ्यात पक्षाचे जिल्हा, तालुका तसेच स्थानिक नेते आणि पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते, या वक्तव्यांमुळे श्रीवर्धन नगरपालिका निवडणुकीला नवे राजकीय वळण मिळणार हे स्पष्ट झाले आहे.

## ना.शं.पाटील हे शिक्षण क्षेत्रातील पुनाडे गावचे तपस्वी; साहित्यरत्न रायगड भूषण प्रा. एल.बी.पाटील.

**दैनिक युवक आधार**

**जिल्हा प्रतिनिधी प्रमुख/ एम.डी.भोईर :** उरण तालुक्यातील पुनाडे गावचे शिक्षक ना.शं.घरत यांनी सेवा काळात ज्या ज्या शाळांवर सेवा केली त्या त्या शाळांमध्ये विद्यार्थ्यांवरच नव्हे तर पालकांवर देखील त्यांच्या शिक्षण पध्दतीने प्रभावित केले होते. सेवानिवृत्तीनौतर वयाच्या ८१ वर्षीही विद्यार्थ्यांना गणित विषयात मार्गदर्शन करीत आहेत.अशा सेवेत राहणारे ते तपस्वी आहेत,असे विचार साहित्यरत्न रायगडभूषण प्रा एल बी पाटील यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात मांडले.ते ना.शं.पाटील यांच्या " पावलां पावलांवर घडत गेलो ",या पुस्तकाच्या प्रकाशना समारंभात बोलत होते.या पुस्तकाचे प्रकाशन प्राचार्य ग.ह.ठाकूर यांच्या हस्ते झाले.प्रास्ताविक के.पां. म्हात्रे यांनी मानले तर देविदास पाटील यांनी कार्यक्रमाचे सुरेख सूत्रसंचालन केले.

सेवेत असताना अनेकांच्या हकार्यामुळे मेहनत करणे सोपे झाले ".असे विचार आपल्या मनोगतात ना.शं.पाटील गुरुजींनी मांडले.यावेळी गटशिक्षणाधिकारी निर्मला घरत,सून जयवंती पाटील



,ग्रामस्थ ना.क.पाटील, आणि दिलीप पाटील हातमोडे गजानन,महादेव भोईर या गुरुजींच्या विद्यार्थ्यांनी आपल्या जीवनातील गुरुजींचं महत्व सांगून उपस्थितांना प्रभावित केले.श्री.सौ.ना.शं.पाटील या उभयतांचे तिन्ही सुनांनी औक्षण केले.यावेळी सूर्यकांत डाकी,ॲड. मच्छिंद्र घरत,एल.एन.भगत,पूर्वा प्रसाद,अभिमन्यू ठाकूर,दर्शन मोकल,द्वारकानाथपाटील,रसिक पाटील,जनार्दन ठाकूर,अविनाश पाटील इत्यादी ग्रामस्थांची मोठी उपस्थिती होती.

# चिखलीत मुख्यमंत्र्यांची जाहीर सभा...

## चिखलीमध्ये भाजपचा नगराध्यक्ष निवडून द्या; विकासाची जबाबदारी माझी - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**दैनिक युवक आधार**

**चिखली प्रतिनिधी सिद्धार्थ धंदरे :** "चिखलीच्या लोकप्रिय आमदार सौ. श्वेताताई महाले यांनी विकासासाठी मागितलेल्या प्रत्येक निधीला शासनाने सकारात्मक प्रतिसाद दिला आणि त्याचा ठोस परिणाम चिखलीमध्ये रस्ते, पाणीपुरवठा, स्वच्छता आणि इतर भौतिक सुविधांमधील सुधारणा मधून दिसून येत आहे.

त्यामुळे आता आ. सौ. श्वेता महाले यांच्या मार्गदर्शनात चिखली नगरपालिका विकासाच्या वेगळ्या उंचीवर घेऊन जाण्याची संधी चिखलीकरांना मिळाली आहे, त्याचे सोने करा असे उद्गार महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांनी आज चिखली येथे काढले.

चिखली शहरातील नगराध्यक्ष पदाचे भाजप उमेदवार श्री पंडित दादा देशमुख तसेच 28 नगरसेवक उमेदवारांच्या प्रचारासाठी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आज चिखलीत दाखल झाले. माता रेणुका मंदिराच्या पावन सान्निध्यात मुख्यमंत्री फडणवीस यांचे भव्य स्वागत चिखली विधानसभा मतदारसंघाच्या आमदार श्वेता ताई महाले पाटील यांच्या हस्ते करण्यात आले.

या वेळी आमदार श्वेता महाले यांनी मुख्यमंत्री फडणवीस यांचा "विदर्भाचा कोहिनूर" असा गौरव करताना, "देवेंद्रजी




जेव्हा-जेव्हा चिखलीत येतात, तेव्हा या राजकीय चिखलात कमळच फुलते. त्यामुळे आजची सभा ही विजयाची सभा ठरेल," असे आत्मविश्वासाने सांगितले.

**"श्वेता महाले यांनी चिखलीचा चेहरामोहरा बदलला" — मुख्यमंत्री फडणवीस**

आपल्या भाषणात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, "चिखलमय रस्त्यांमुळे चिखलीला नाव मिळाले होते, मात्र तीन वर्षांत श्वेता महाले यांनी केलेल्या विकासामुळे चिखली प्रगतीच्या दिशेने धडाडीने आगेकूच करत आहे," असे मुख्यमंत्र्यांनी गौरवोद्गार काढले.

**भ्रष्टाचारावर फडणवीस यांचा टोला**

दीर्घकाळ नगरपालिका चालवणाऱ्या विशिष्ट कुटुंबावर टीका करत फडणवीस म्हणाले की, त्यांना सामान्यांचे काही देणे-घेणे नव्हते."भाजपा मात्र भ्रष्टाचाराला कधीही स्थान देत नाही. स्वतःच्या नगराध्यक्षाने चुकी केली तरी त्याला काढून टाकण्याचे धैर्य भाजपामध्येच आहे,आणी चिखलीमध्येच आ. सौ महाले यांनी अशा भ्रष्ट नगराध्यक्षाला पदावरून काढून पारदर्शकतेचा पायंडा घालून दिला आहे " असे त्यांनी स्पष्ट केले.

**विकास योजनांवर महत्त्वपूर्ण घोषणा**

आमदार श्वेता महाले यांनी चिखलीकरांसाठी,128 कोटींची पाणीपुरवठा योजना,वायझडी तलावासाठी 14 कोटी,रस्त्यांसाठी 130 कोटी,विविध प्रकल्पांसाठी 80 कोटी असे शेकडो कोटींचा निधी आणला आहे. यासाठी आमदार श्वेता महाले यांचे विशेष अभिनंदन करताना मुख्यमंत्री म्हणाले की "चिखली शहरात उभारला जाणारा छत्रपती शिवाजी महाराजांचा अश्वारूढ पुतळा हा चिखलीकरांसाठी अतिशय अभिमानाची बाब ठरेल त्याच पार्श्वभूमीवर घटनेचे निर्माते महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महात्मा फुले आणि सावित्रीबाई फुले यांच्या पुतळ्यांचीदेखील त्यांनी घोषणा केली.

**नगरपालिकेची सत्ता भाजपाकडे देण्याचे आवाहन**

शहराच्या वाढत्या लोकसंख्येनुसार शिक्षण, आरोग्य, स्वच्छता, भुयारी गटार, घनकचरा व्यवस्थापन यांसारख्या प्रकल्पांसाठी भाजपाकडे तयार 'विकास ब्ल्यू प्रिंट' पुढे नेण्यासाठी भाजपा सक्षम असल्याचे सांगत त्यांनी मतदारांना पंडित दादा देशमुख यांना नगराध्यक्षपदी निवडून देण्याचे आवाहन केले.

"चार इंजिनची ताकद — केंद्र सरकार, राज्य सरकार, आमदार आणि भाजपा नगरपालिका मिळाल्यास चिखलीचा विकास वेगाने होईल," असे फडणवीस म्हणाले.

**अफवा पसरवणाऱ्या विरोधकांवर निशाणा**

बुलढाणा जिल्ह्यामध्ये काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष देखील राहतात व येथील प्रदेशाध्यक्ष व जिल्हाध्यक्ष यांना फक्त अफवा पसरवण्याचे काम असून संविधानाबद्दल, बॉम्बे मार्केट बद्दल आणि विविध विकासाच्या योजना बद्दल हे दोघे नेहमी अफवा पसरवत असतात असे आमदार श्वेता महाले पाटील यांनी मुख्यमंत्री श्री देवेंद्र फडणवीस यांचे लक्षात आणून दिले तेव्हा काँग्रेसला आता महाराष्ट्रात कोणीही ओळखत नसलेला प्रदेशाध्यक्ष मिळालेला आहे त्यामुळे ओळख मिळवण्यासाठी तेवढीच कामे त्यांना उरली आहे अशी टीका मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली. संविधान बदल, बॉम्बे मार्केट, विकास योजना यावर विरोधकांकडून पसरवल्या जाणाऱ्या अफवा निराधार आहेत."बॉम्बे मार्केटला कोणी हात लावणार नाही. व्यापारी जे ठरवतील तेच होईल," असा शब्द त्यांनी दिला.

या सभेला कामगार मंत्री ॲड. आकाश फुंडकर, जिल्हाध्यक्ष विजयराज शिंदे, डॉ. प्रतापसिंग राजपूत, ॲड. विजयकुमार कोठारी,नगराध्यक्षपदाचे उमेदवार पंडित दादा देशमुख, प्रकाश महाराज जवंजाळ, सुरेश कबुतरे, सतीश गुप्त, विजय गवई, आशुतोष गुप्त, शिवराज पाटील आणि 28 नगरसेवक उमेदवार उपस्थित होते...

## सेलू नगर परिषद निवडणूक : अपक्ष उमेदवारांना आज चिन्हांचे वाटप

**दैनिक युवक आधार**

**सेलू प्रतिनिधी शिवाजी पवार**

सेलू नगर परिषद निवडणुकीसाठी आज दिनांक २६ नोव्हेंबर रोजी अपक्ष उमेदवारांना अधिकृत चिन्हांचे वाटप होणार आहे. अधिकृत प्रक्रिया आज पार पडणार असली, तरी प्रत्यक्षात मात्र अनेक अपक्ष उमेदवारांनी याआधीच आपापल्या पद्धतीने प्रचाराची धुरा हाती घेतली आहे.




निवडणूक रिंगणात उतरलेल्या अपक्ष उमेदवारांनी प्रभागात गाठीभेटी सुरू केल्या असून, प्रभागात स्वतःची उपस्थिती लवकरात लवकर दृढ करण्यावर त्यांचा भर दिसत आहे. कोणते चिन्ह मिळणार याची अधिकृत घोषणा अद्याप व्हायची असली, तरी 'चिन्ह काहीही असो, पाठिंबा तुमचा हवा' या भावनेने अनेक अपक्षांनी घरदार ठोठावण्यास सुरुवात केली आहे. मतदारांशी संवाद, दैनंदिन संपर्क, परिसरातील छोट्या बैठका,आणि सोशल मीडियाद्वारे ओळख निर्माण करण्याचे प्रयत्न अगदी जोमात सुरू आहेत. काही अपक्षांनी तर आपल्याला कोणते चिन्ह मिळू शकते याचा अंदाज घेत आगाऊ प्रचार साहित्यही तयार केल्याचे दिसते.निवडणूक आयोगाकडून अधिकृत चिन्ह मिळाल्यानंतर अपक्ष उमेदवारांचा प्रचार आणखी जोर धरण्याची शक्यता आहे. मात्र चिन्हवाटपापूर्वीच सुरू झालेला हा 'अनौपचारिक' प्रचार नेमका किती परिणामकारक ठरणार, हे येणारा काळच ठरवेल.एकंदरीत, सेलू नगर परिषद निवडणुकीत अपक्ष उमेदवारांची धडपड आणि तयारी पाहता, त्यांच्या लढतीला यंदा वेगळेच रंग चढणार हे निश्चित!

सिद्धी प्रिंटर्स
दैनिक,सायंदैनिक, साप्ताहिक, मासिक, इत्यादी
वर्तमानपत्राचे सर्व साइज मधे ब्लॅक, कलर व ४कलर
प्रिंटींग वाजवी दरात करून मिळेल.
वर्तमान पत्राचे सर्व साईज मधे आकर्षक डिझाईन मध्ये
डीटीपी करून मिळेल
Call 9028240020 ,9220403509

# युवकांमध्ये संविधानिक मूल्यांची रुजवण

## आईटीआय कारंजा येथे 'सेल्फी विथ संविधान' उपक्रमांतर्गत उपयुक्त सत्र

**दैनिक युवक आधार**
**वाशिम जिल्हा प्रतिनिधी करण धोंगडे**

**कारंजा :** अनुभव शिक्षा केंद्र अमरावती–वाशिम यांच्या वतीने 'सेल्फी विथ संविधान' उपक्रमाच्या माध्यमातून औद्योगिक प्रशिक्षण केंद्र, कारंजा येथे संविधानिक मूल्यांवर आधारित एकदिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. दि. २४ नोव्हेंबर २०२५ रोजी आयोजित या कार्यशाळेला युवकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.या कार्यशाळेमध्ये भारतीय संविधानातील मूलभूत मूल्ये—न्याय, स्वातंत्र्य, समता आणि बंधुता—यांविषयी सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. युवकांमध्ये लोकशाही मूल्यांची जाण वाढावी, सामाजिक बांधिलकी बळकट व्हावी आणि संविधानाचे भान अधिक दृढ व्हावे, हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश असल्याचे आयोजकांनी सांगितले. कार्यक्रमाचे मार्गदर्शक म्हणून आशिष धोंगडे, जिल्हा प्रशिक्षक, अनुभव शिक्षा केंद्र अमरावती–वाशिम,




यांनी संविधानिक मूल्यांचे महत्त्व समजावून देत प्रेरणादायी संवाद साधला. तसेच सचिन भोयर सर प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.कार्यक्रमादरम्यान युवकांना अनुभव शिक्षा केंद्राच्या मूल्याधिष्ठित उपक्रमांची माहिती देण्यात आली. कार्यशाळेला विद्यार्थ्यांनी मोठ्या उत्साहाने सहभाग नोंदविल्याने केंद्रातील वातावरण उत्साहवर्धक झाले.संविधान सप्ताहाच्या निमित्ताने राबविण्यात येत असलेल्या या उपक्रमामुळे युवकांमध्ये संविधानाबद्दलची जागरूकता अधिक वृद्धिंगत होत असल्याचे निरीक्षण व्यक्त करण्यात आले.

# अभिमान आहे आम्हा संविधानाचा... समता, स्वातंत्र्य, न्याय आणि बंधुत्वाचा

जगातील कोणत्याही देशापेक्षा सर्वात मोठे लिखित असे संविधान तयार करुन, केवळ भारतच नव्हे तर संपूर्ण जगाला महत्वपूर्ण संविधानरुपी अनमोल असा ठेवा भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी दिला. निश्चितच हे संविधान म्हणजे आपल्याला मिळालेले अलौकिक असे अनमोल, दिव्य रत्न आहे. २६नोव्हेंबर १९४९ रोजी आपले भारतीय संविधान संमत झाले मात्र त्याची अंमलबजावणी २६जानेवारी १९५० रोजी सुरू झाली. यास ७६वर्षे पूर्ण झाली आहेत.

भारतीय संविधान हे इंग्रजी भाषेत असून हिंदी भाषेतील प्रतही कायदेशिरदृष्ट्या ग्राह्य आहे. जागतिक पातळीवर श्रेष्ठत्व असलेले आपले संविधान म्हणजे तमाम भारतीयांचा अभिमान आहे आणि म्हणूनच आपण "अभिमान आम्हाला संविधानाचा... समता, स्वातंत्र्य, न्याय आणि बंधुत्वाचा'' असे अभिमानाने म्हणू शकतो.

भारताचे संविधान म्हणजेच भारतीय राज्यघटना. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना या राज्यघटनेचे शिल्पकार म्हणून संबोधले जाते. आज जवळपास ६८ वर्षांपासून डॉ. आंबेडकरांनी तयार केलेल्या या संविधानाच्या आधारे आपले भारतीय संघराज्य व व्यवस्था सुरळीतपणे चालू आहे. १५ ऑगस्ट १९४७ ला आपल्याला स्वातंत्र्य मिळाले आणि तद्नंतर म्हणजे २९ ऑगस्ट १९४७ रोजी संविधान समिती स्थापन झाली. या समितीचे अध्यक्ष डॉ. राजेंद्र प्रसाद, उपाध्यक्ष डॉ. एस. सी. मुखर्जी व सल्लागार म्हणून डॉ. बी. एन. राव यांची निवड करण्यात आली. या समितीत प्रामुख्याने पंडित जवाहरलाल नेहरू, सरदार पटेल, डॉ.बाबासाहेब आंबेडकर, डॉ. राधाकृष्णनन, के. एम. मुन्शी व डॉ. जयकर यांचा समावेश होता. या समितीने संविधानाच मसुदा तयार करण्यासाठी भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या अध्यक्षतेखाली मसुदा समितीची स्थापना केली. या समितीने अखंड मेहनत घेऊन भारतीय संविधानाची निर्मिती केली.

या समितीने घटनेमध्ये आपल्या जन-गण-मन या गुरूवर्य रवींद्रनाथ टागोर यांच्या गीताला राष्ट्रगीताचा सन्मान दिला तसेच राष्ट्रध्वजाचीही निर्मिती करण्यात आली. घटनेच्या पहिल्या मसुद्यामध्ये ३१५ कलमे व ७ परिशिष्ट होती पुढे त्यात वाढ झाली. या संविधानाची उद्देशिका पुढीलप्रमाणे आहे. "आम्ही भारताचे लोक, भारताचे एक सार्वभौम समाजवादी धर्मनिरपेक्ष लोकशाही गणराज्य घडविण्याचा व त्याच्या सर्व नागरिकांस सामाजिक, आर्थिक व राजनैतिक न्याय, विचार, अभिव्यक्ती, विश्वास, श्रध्दा व उपासना यांचे स्वातंत्र्य दर्जाची व संधीची समानता: निश्चितपणे प्राप्त करुन देण्याचा आणि त्या सर्वामध्ये व्यक्तीची प्रतिष्ठा व राष्ट्राची एकता आणि एकात्मता यांचे आश्वासन देणारी बंधुता प्रवर्धित करण्याचा संकल्पपूर्वक निर्धार करुन, आमच्या संविधान सभेस आज दिनांक २६ नोव्हेंबर १९४९ रोजी याद्वारे हे संविधान अंगीकृत आणि अधिनियमित करुन स्वत:प्रत अर्पण करीत आहोत."

यात नमूद केले आहे की आपला देश हा सार्वभौम (Sovereign), समाजवादी (Socialist), धर्मनिरपेक्ष (Secular) आणि प्रजासत्ताक (Republic) आहे. या उद्देशिकेच्या प्रत्येक शब्दातून आपणास संविधानाची महती लक्षात येते.

**संविधानाची दिव्यता**

भारताचे संविधान म्हणजे राज्यघटना संदर्भात विविध वैशिष्ट्ये आहेत. यात प्रामुख्याने संघराज्य व त्याचे राज्यक्षेत्र, नागरिकत्व, मूलभूत हक्क, समानतेचा हक्क, स्वातंत्र्याचा हक्क, शोषणाविरुध्द हक्क, धर्मस्वातंत्र्यांचा हक्क, सांस्कृतिक व शैक्षणिक हक्क, संविधानिक उपाययोजनेचा हक्क, विवक्षित कायद्यांचे व्यावृत्ती, त्याचप्रमाणे राज्य धोरणांची निदेशक तत्वे, मूलभूत कर्तव्ये, संघराज्य, राज्य, त्याची कार्यपध्दती, न्यायालये, न्यायाधिकरणे, निवडणुका, आणीबाणी, राज्यभाषा या खेरिज संकीर्ण यात उर्वरीत सर्व विषय समाविष्ट होतात. अशा सर्व स्तरावरील बाबींचा समावेश आहे. भारतीयांना त्याच्या प्रत्येक स्वातंत्र्याचा अथवा जगण्याचा अधिकार, हक्क याचे स्पष्ट व सखोल मार्गदर्शन या घटनेत आहे. त्यामुळे ही घटना प्रत्येक भारतीयाला आपलीच वाटेल अशी आहे. राज्यकारभाराविषयीचे नियम, अधिकार, कर्तव्ये, लोकांचे सार्वभौमत्व आदी यात आहे. २६ जानेवारी १९५० पासून या घटनेनूसारच आपल्या भारत देशाचा राज्यकारभार सुरू झाला. म्हणूनच २६ जानेवारी हा दिवस प्रजासत्ताक दिन म्हणून एक राष्ट्रीय सण म्हणून साजरा करतो.

१७ डिसेंबर १९४६ रोजी भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी संविधान सभेत केलेले या संदर्भातील त्यांचे पहिले भाषण अत्यंत महत्वपूर्ण असे आहे. संविधान सभेचे अध्यक्ष डॉ. राजेंद्र प्रसाद यांनी अकस्मातपणे डॉ.बाबासाहेबांचे नाव भाषणासाठी पुकारले आणि भारतरत्न डॉ. बाबासाहेबांनी अमोघ असे भाषण केले. या भाषणाचे वर्णन करताना श्री. न. वि. गाडगीळ म्हणाले की, " त्यांचे भाषण इतके मुत्सद्याला शोभणारे होते, इतके कटुतेशिवाय, इतके प्रामाणिक आवाहन करणारे होते की, संपूर्ण सभागृह मतिगुंग झाल्याप्रमाणे ऐकत होते". संविधान सभेमध्ये अशा प्रकारे पहिलेच भाषण प्रभावीपणे करुन डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी संविधानाची महती स्पष्ट केली. एकसंघ भारताच्या उन्नतीची धारणा डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या संविधान निर्मितीमागे होती. १० जून १९५० रोजी सिलोन दौऱ्यावरुन परत येतांना त्रिवेंद्रम येथे लेजिसलेटिव्ह चेंबरमध्ये त्यांनी एक भाषण केले. त्या भाषणात अत्यंत महत्वपूर्ण अशी गोष्ट स्पष्ट केली ती म्हणजे "घटनात्मक नितीचे काटेकोरपणे पालन करा". यावेळी बोलताना ते म्हणाले, "प्रत्यक्ष घटनेपेक्षा घटनेप्रमाणे वागण्याची नीती जनतेत असणे या गोष्टीला फार महत्व आहे. देशाला पार्लमेंटरी लोकशाहीची पध्दत यशस्वी व्हावयाची असेल तर सरकार व जनता या उभयतांनी घटनेतील काही संकेत आणि नीती यांचे पालन करणे आवश्यक आहे. हे संकेत व नीती पुढीलप्रमाणे- सरकार बनविण्याच्या पध्दतीविषयी आदर, कायद्याचे पालन, स्वतंत्र विचार करण्याची सवय व बहुसंख्याकांच्या नियमाचे पालन"

घटना समितीचे अध्यक्ष या नात्याने, भारतीय राज्यघटना भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी देशाला देऊन जागतिक पातळीवर भारतीय सार्वभौमत्वाचे गौरवचिन्ह निर्माण केलेले आहे. केवळ संविधानच नव्हे तर डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे प्रत्येक क्षेत्रातील विचारही तेजस्वी, प्रखर व मौलिक असे आहेत.

**डॉ.राजू पाटोदकर.**
**मुख्य जनसंपर्क अधिकारी**
**पनवेल महानगरपालिका, पनवेल**

**संदर्भ :1) बोल महामानवाचे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची 500 मर्मभेदी भाषणे-(खंड दोन) डॉ.नरेंद्र जाधव-ग्रंथाली प्रकाशन मुंबई . 2) भारताचे संविधान (The Constitution of India)- संकलन-राजेश अशोक चौधरी, चौधरी लॉ पब्लिशर्स जळगाव,**

# सुवर्ण भरारी सेवाभावी संस्थेच्या वतीने आरोपीस फाशी देण्यात यावी लोणी पोलीस स्टेशनला निवेदन

**दैनिक युवक आधार**
**लोणी (प्रतिनिधी) ज्ञानेश्वर साबळे** : सर्व समाज बांधव व सामाजिक कार्यकर्त्यांनी एकत्र येऊन लोणी पोलीस स्टेशन येथे माननीय श्री वाघ साहेब यांना डोंगराळ येथील तालुका मालेगाव जिल्हा नाशिक येथील कु. यज्ञा दुसाने या चिमुकलीवर जो क्रूर पद्धतीने हत्या करण्यात त्या नराधमाला फास्टट्रॅक वरती केस घेऊन सरकारी वकील उज्वल निकम साहेब यांच्याकडे ही केस द्यावी अशी मागणी समाजातून होत आहे *आरोपीला फाशी शिक्षा




झालीच पाहिजे* यासाठी सर्वांनी मिळून निवेदन सादर केले या प्रसंगी डॉ.सारिका ताई नागरे, सौ स्वाती ताई मुंडलिक, रवी माळवे पुणे, प्रमोद पंडित, शामभाऊ गोसावी, संतोष सोनार,विजय माळवे, मेजर शेवंते साहेब, जी डी चिंतामणि साहेब, श्रीपाद बोकंद,सोमनाथ आहेर, पत्रकार,ज्ञानेश्वर साबळे, गुरुनाथ बोराडे,सुनील उदावंत ,प्रकाश मैड, अर्चना लोळगे,बेबी लोखंडे बबन पारखे, सरोजनी, पत्रकार,शंकर सोनवणे,अनिल लोखंडे, यांची उपस्थिती होती.

# सुवर्णकार समाजातील चिमुकलीवरील अत्याचार व निघृण हत्येप्रकरणी मुरुडमध्ये जाहीर निषेध

**दैनिक युवक आधार**
**लातूर / मोहम्मद पिंजारी : मुरुड** : मौजे डोंगराळे (ता. मालेगाव, जि. नाशिक) येथे सुवर्णकार समाजातील केवळ ३ वर्षांची चिमुकली कु. यज्ञा हिच्यावर अमानुष पद्धतीने अत्याचार करून तिची निघृण हत्या करण्यात आल्याची संतापजनक घटना प्रकाशात आली असून या प्रकरणाने संपूर्ण महाराष्ट्राचे मन हेलावून टाकले आहे. या प्रकारामुळे राज्यातील कायदा-सुव्यवस्थेची गंभीर स्थिती पुन्हा एकदा अधोरेखित झाली




आहे. ही घटना माणुसकीला काळीमा फासणारी असून पुरोगामी महाराष्ट्रासाठी मोठा कलंक मानली जात आहे

या भीषण गुन्ह्याबद्दल आरोपीवर तात्काळ व कठोर कायदेशीर कारवाई करण्यात यावी, खटला फास्टट्रॅक न्यायालयात चालवून शक्य तितक्या लवकर फाशीची शिक्षा सुनावावी, अशी मागणी निषेधकर्त्यांनी केली.

राज्यात भविष्यात अशा अमानुष घटनांना आळा बसावा यासाठी शासनाने अधिक प्रभावी आणि कडक उपाययोजना राबवाव्यात, अशीही मागणी यावेळी करण्यात आली

निष्पाप बालिकेला न्याय मिळणे आणि गुन्हेगारास कठोर शिक्षा होणे हीच तिच्या आत्म्याला खरी श्रद्धांजली ठरेल, असे समाजबांधवांनी सांगितले यावेळी उपस्थितांमध्ये अध्यक्ष संतोष पाडोळीकर, उपाध्यक्ष सावता माळी, सचिव संतोष कोकरे, उपाध्यक्ष विशाल चांडक यांच्यासह मुरुड येथील समाजबांधव — नितीन वेदपाठक, संतोष दीक्षित, राहुल दीक्षित, सुरेश दीक्षित, सतीश दीक्षित, भास्कर महामुनी, विकास दीक्षित, चौधरी आप्पा, शिवाजी चांडक, नितीन महामुनी, संतोष पोतदार, नारायण पोतदार, राजा विधाते, श्रीनिवास लाड व इतर अनेक सुवर्णकार बांधवांचा सहभाग होता.

# प्रत्येक घराघरात आरोग्य आणि आनंद यांचा संगम

**दैनिक युवक आधार**
**मुंबई / रमेश औताडे** : भारतातील प्रत्येक घराघरात आरोग्य आणि आनंद यांचा संगम सदैव राहण्यासाठी व सामान्य माणसाला आरोग्य सेवा परवडेल यासाठी नवीन, प्रगत तंत्रज्ञानाचा उपयोग करत शहरी व ग्रामीण भागातील जनतेला आरोग्य सेवा देण्याचा आमचा मानस आहे. असे मत अपोलो हॉस्पिटल ग्रुप चे अध्यक्ष डॉ प्रताप सी रेड्डी पत्रकार परिषदेत सांगितले.अपोलो हॉस्पिटल्सने पुण्यातील स्वारगेट येथे आपले नवे हॉस्पिटल सुरु केले असून ४०० बेड्सची क्षमता असलेले हे रुग्णालय अतिउच्च दर्जाचे आहे असे हॉस्पिटल्सच्या कार्यकारी उपाध्यक्ष डॉ प्रीता रेड्डी यांनी सांगितले. चार दशकांहून अधिक काळापासून चालत आलेला वारसा पुढे नेत आहोत. रुग्णांनी गेल्या अनेक पिढ्यांपासून आमच्यावर ठेवलेल्या विश्वासाचा आम्ही सन्मान करत आहोत.

व्यवस्थापकीय संचालिका सुनीता रेड्डी




यांनी सांगितले,"आमचे पुणे हॉस्पिटल अपोलोच्या वाढत्या राष्ट्रीय विस्तारामध्ये उचलण्यात आलेले एक धोरणात्मक पाऊल आहे. मुख्य कार्यकारी अधिकारी आणि अध्यक्ष डॉ मधू ससिधर यांनी सांगितले,"आमचे पुणे हॉस्पिटल सुरक्षा विज्ञान, पुराव्यांवर आधारित प्रॅक्टिस आणि एका अशा संस्कृतीच्या पायावर उभारण्यात आले आहे. मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ मनीषा कर्माकर यांनी सांगितले,"पुणे शहरामध्ये आमचे नवे हॉस्पिटल क्लिनिकल उत्कृष्टतेप्रती अपोलोची बांधिलकी दर्शवते.

# सेल्फी विथ संविधान' उपक्रमांतर्गत पथनाट्याद्वारे संविधान जागर;अनुभव शिक्षा केंद्र अमरावती–वाशिमचा उपक्रम उत्साहात

**दैनिक युवक आधार**
**वाशिम जिल्हा प्रतिनिधी करण धोंगडे**

**कामठा :** अनुभव शिक्षा केंद्र अमरावती–वाशीम यांच्या माध्यमातून राबविण्यात येणारा *'सेल्फी विथ संविधान'हा सप्ताह कामठा ग्रामात उत्साहात सुरू झाला. उपक्रमाच्या औचित्याने संविधानाचे महत्त्व आणि संवैधानिक मूल्यांचा जागर करण्यासाठी पथनाट्याचे आयोजन करण्यात आले. न्याय, स्वातंत्र्य, समता आणि बंधुता या संविधानातील मूलभूत मूल्यांचे




स्पष्टीकरण प्रभावी अभिनय, संवाद आणि संदेशप्रधान कथानकातून नागरिकांपर्यंत पोहोचविण्यात आले.

पथनाट्यामध्ये नागरिकांच्या दैनंदिन जीवनात संविधान किती महत्त्वाची भूमिका बजावते, तसेच समाजात मूल्याधिष्ठित वर्तन किती गरजेचे आहे, याविषयी प्रभावी मांडणी करण्यात आली. 'सेल्फी विथ संविधान' या उपक्रमाचा उद्देश फक्त फोटो काढणे हा नसून, संविधानातील तत्त्वे प्रत्यक्ष आचरणात आणण्याचा संदेश देणे हा असल्याचे आयोजकांनी सांगितले.या कार्यक्रमाचे आयोजन आशिष धोंगडे यांच्या पुढाकारातून करण्यात आले. प्रमुख उपस्थिती म्हणून अनुभव साथी रोशन चौधरी यांनी मार्गदर्शन केले. अनुभव कट्ट्याचे संयोजक आशिष थोरात, सुदर्शन थोरात, शेषराव वरठी यांचे विशेष सहकार्य लाभले. ग्रामस्थांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाल्याने कार्यक्रम अधिक अर्थपूर्ण झाला.कामठा ग्रामात संविधान जागराने सुरू झालेला *'सेल्फी विथ संविधान'* सप्ताह आगामी अनेक उपक्रमांद्वारे संवैधानिक मूल्यांची जनजागृती करत राहणार आहे.

# वरखेडी नगरीत नाथ बाबा पालखी यात्रा उत्सव भव्य मिरवणूक मोठ्या उत्साहात संपन्न

**दैनिक युवक आधार**
**समाधान पाटील जळगाव जिल्हा प्रतिनिधी :** एरंडोल तालुक्यातील वरखेडी नगरीत 25 नोव्हेंबर रोजी नाथ बाबा यात्रा उत्सव निमित्त वरखेडी नगरीत भव्य मिरवणूक काढण्यात आली असताना अभुतपुर्व प्रतिसाद वरखेडी नगरीतील ग्रामस्थ मंडळीना लाभला.

व नाथ बाबांचा नामाचा गजर करत शेकडो वरखेडी नगरीतील ग्रामस्थ मंडळींनी संकट मोचन मारुती मंदिरावर सकाळी नऊ ते साडे नऊ यावेळेत प्रभु नाथबाबांचे पालखी चे प्रतिमेचे पादुकांचे पूजन ग्रामस्थ व भक्तगणांकडून करण्यात आली,



त्यानंतर नऊ ते दहा पर्यंत प्रभु नाथ बाबा ची पालखीचे मिरवणूक व यांचा गितांचा व मोहन ब्रँड च्या तालाच्या गजरवर, दहा वाजता भंजनाचा गजरसह पुर्ण वरखेडी नगरीत मोठ्या संख्येने गावातील भाविक भक्तांनी नाथ बाबाची पालखी ची मिरवणूक मोठ्या थाटामाटात संपूर्ण गावामध्ये मोहन ब्रँड च्या गजरात भव्य अशी मिरवणूक काढण्यात आली.

नाथ बाबा च्या घोषणा देत लहान थोर मंडळी मोठ्या उत्साहात सहभागी झाले.

याप्रसंगी गावातील सर्व महिला मंडळ मोठ्या संख्येने नाथ बाबा ची पालखी मिरवणूक व यात्रा उत्साहात मध्ये सहभागी झाले सदर कार्यक्रमांत वरखेडी नगरीतील ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# संविधान बांधिलकी महोत्सव अंतर्गत संविधान दिवस समारोह

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी ज्योत्सना करवाडे**

**विदर्भ प्रमुख** : महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती अंनिस नागपूर जिल्हा, संविधान जागर अभियान, अंगणवाडी कर्मचारी सभा, विदर्भ मोलकरीण संघटना यांच्या संयुक्त विद्यमाने संविधान दिवस साजरा करण्याचे योजिले आहे. संविधान चौक, नागपूर दिनांक बुधवार २६ नोव्हेंबर२०२५ सकाळी ८.०० वाजता पासून भरगच्च कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहेत.

महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती अंनिस नागपूर जिल्हा, तर्फे दरवर्षी प्रमाणे विविध माहिती उपलब्ध करून देण्यासाठी स्टॉल लावण्यात येतो, नागरिकांना सहभागी होण्यासाठी चंद्रशेखर




मेश्राम,उत्तम सालवणकर,प्रा. पुष्पा घोडके,आकाश नंदेश्वर यांना संपर्क साधावा .

**संविधान रैली**

महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती अंनिस नागपूर जिल्हा, संविधान जागर अभियान, अंगणवाडी कर्मचारी सभा, विदर्भ मोलकरीण संघटना यांच्या संयुक्त विद्यमाने संविधान रैली वरील सर्व संघटनेच्या वतीने दुपारी 2.00 वा प.पू डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून संविधान चौकातून संविधान रैली निघेल व, मॉरिस कॉलेज झिरो माईल्स, फ्रिडम पार्क मार्गे, शहिद गोवारी स्मारक व परत संविधान चौक येथे सभेत रुपांतरीत होईल.

सभेत वरील संघटनेचे प्रमुखांचे संविधान दिवस वर यथोचित भाषणें होतील.जागरुकता संविधान कीयाच दरम्यान पथनाट्य, संविधान गीतें,नृत्य व अन्य उपक्रम सादर करण्यात येतील."जागरुकता संविधान की" पथनाट्य होईल. कु.तनशु राऊत यांचे नृत्य सादर केले जाईल सिने गायीका अल्का लाडे व टिम यांचे संविधान गीत सादर करण्यात येईल. आभारप्रदर्शनानंतर कार्यक्रमाची सांगता होईल."संविधान जागर" .संध्याकाळी ५.३०वाजता अजय रहाटे व चमू द्वारे "जागरुकता संविधान की " या नाटकाचा प्रयोग, कांजी हौस, बारा नल चौक ,शाहू मोहल्ला नागपूरया ठिकाणी पण होईल, तिथेही सर्वांनी उपस्थित राहावे.राज्य कार्यकारिणी सदस्य रामभाऊ डोंगरे,विजयाताई श्रीखंडे, राम काळे, जिल्हा कार्याध्यक्ष चित्तरंजन चौरे, जिल्हा प्रधान सचिव डॉ.प्रा.सुनील भगत, देवयानी भगत,प्रा.पुष्पा घोडके, इंजि. गौतम पाटील, शोभा पाटील विभूतीचंद्र गजभिये, डॉ.विकास होले,देवानंद बडगे, विजया ठाकरे, मंगला गाणार, सुषमा शेवडे, इंदू उमरे, प्रीती नगरारे, चंदा मोटघरे, वसंत मोहिले, शारदा मोटघरे, आणि इतर सदस्यांनी सर्वांनी उपस्थित राहावे हे आव्हान केलेले आहे.

# लोणी गावाचा गौरव! प्रामाणिकपणाचे अनोखे उदाहरण; – युवक महादेव सांगळे यांचा नागरी सत्कार

**दैनिक युवक आधार**
**आष्टी प्रतिनिधी बाळासाहेब रकटाटे :** लोणी गावातील आदर्श आणि कर्तृत्ववान युवक श्री. महादेव बापूराव सांगळे यांनी आपल्या प्रामाणिक वर्तणुकीने संपूर्ण समाजासमोर आदर्श निर्माण केला आहे. अहिल्यानगर येथे गुरु गणेश ट्रॅव्हल्समध्ये ड्रायव्हर म्हणून कार्यरत असलेल्या सांगळे यांनी लक्झरी बसमध्ये प्रवास करणाऱ्या एका तरुणीचे हरवलेले रु. 1 लाख 30 हजार रुपये स्वतः फोन करून तिला सुरक्षितरीत्या परत केले.

सापडलेली इतकी मोठी रक्कम कोणत्याही मोहाला न



लागता संबंधित मालकापर्यंत पोहोचवण्याचे काम सांगळे यांनी प्रामाणिकपणे पार पाडले. त्यांच्या या कर्तव्यदक्ष, प्रामाणिक आणि आदर्श वागणुकीमुळे संपूर्ण लोणी गावाचा सन्मान वाढला आहे.

त्यांच्या या उल्लेखनीय कार्याचा गौरव करण्यासाठी आज लोणी ग्रामस्थांच्या वतीने त्यांचा नागरी सत्कार करण्यात आला. ग्रामस्थांनी सांगळे यांच्या प्रामाणिकतेचे मनापासून कौतुक करत त्यांना सामाजिक आदर्श ठरल्याचे गौरवोद्गार काढले.अशा प्रामाणिक तरुणांमुळे समाजात सकारात्मकता आणि मूल्यांचा दीप उजळतो, अशी भावना या प्रसंगी व्यक्त करण्यात आली.

# एकल इमारतींच्या प्रस्तावांना म्हाडा आठवड्याभरात मंजुरी देणार

## ३८८ म्हाडा पुनर्रचित इमारतींचा पुनर्विकास समूह पुनर्विकासाच्या माध्यमातून होणार

## स्वयं/समूह पुनर्विकास प्राधिकरणाचे अध्यक्ष आ. प्रविण दरेकरांनी घेतलेल्या बैठकीत निर्णय

**दैनिक युवक आधार**

**मुंबई / प्रतिनिधी :** महाराष्ट्र गृहनिर्माण स्वयं/समूह पुनर्विकास प्राधिकरणाचे अध्यक्ष आमदार प्रविण दरेकर यांच्या अध्यक्षतेखाली सोमवारी म्हाडातील त्यांच्या दालनात मुंबईतील म्हाडा पुनर्रचित ३८८ इमारतींचा पुनर्विकास तसेच मुंबईतील १३,८०० उपकरप्राप्त व जुन्या चाळी आणि इमारतींच्या पुनर्विकासातील अडचणींसंदर्भात बैठक पार पडली. या इमारतींच्या पुनर्विकासातील अडथळ्यांबाबत बैठकीत सविस्तर चर्चा झाली.

या बैठकीला म्हाडाचे उपाध्यक्ष संजीव जैस्वाल, म्हाडाचे मुख्य अधिकारी मिलिंद शंभरकर, उत्तर मुंबईचे माजी खासदार गोपाळ शेट्टी, आमदार प्रसाद लाड, म्हाडाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी अनिल वानखेडे, संघर्ष समितीच्या विनिता राणे यांची उपस्थिती होती.

**३८८ म्हाडा पुनर्रचित इमारतींचा पुनर्विकास समूह पुनर्विकासाच्या माध्यमातून होणार**

दरेकर यांनी बैठकीत निदर्शनास आणून दिले की, जवळपास ६० ते ७० इमारती या शिवडी विधानसभा व वडाळा विधानसभा क्षेत्रात तर ६० ते ७० इमारती ह्या भायखळा विधानसभा या भागात आहेत. यापैकी अनेक म्हाडा इमारती समूह पुनर्विकास याअंतर्गत विकसित होऊ शकतात. म्हणजेच अनेक ठिकाणी फक्त म्हाडा इमारतींचाच एकत्रित क्लस्टर तयार होत आहे. या इमारती म्हाडा दुरुस्ती मंडळाच्या असून कुठेही उपकर प्राप्त इमारतीचा समावेश नाही. त्यामुळे या सर्व इमारतींचा समूह पुनर्विकास म्हाडा दुरुस्ती मंडळाने करावा. रहिवाशांमधील अंतर्गत वादामुळे विकासक निवडीच्या प्रक्रियेचा प्रदीर्घ कालावधी वाचेल आणि म्हाडाच्या माध्यमातून पारदर्शक पद्धतीने, योग्य व सक्षम, सुरक्षित व कालबद्ध पुनर्विकास होऊन मूळ मुंबईकरांना घरे मिळतील.



अशाच प्रकारे लोअर परळ, प्रभादेवी, दादर, माहीम, वडाळा, मानखुर्द, सायन, गिरगाव, भायखळा, उमरखाडी, मदनपुरा, माझगाव, डोंगरी, ग्रॅन्ट रोड या सर्व विभागात देखील म्हाडा इमारतींचे क्लस्टर आहेत.

म्हाडातर्फे भूमिका मांडताना म्हाडा उपाध्यक्ष संजीव जैस्वाल यांनी सांगितले की, म्हाडा पुनर्रचित ३८८ इमारतींपैकी ज्या इमारती सलग आहेत, अशा इमारतींचा एकत्रित पुनर्विकास करावयाचा असेल तर अशा इमारतीतील रहिवाशांनी सभा घेऊन विकासकाची निवड करावी व तशाप्रकारचा प्रस्ताव म्हाडाला सादर करावा. म्हाडानेच अशा इमारतींचा समूह पुनर्विकास करावा, अशाप्रकारचा निर्णय सभेत घेतल्यास तशाप्रकारचा प्रस्ताव म्हाडाला सादर करावा. म्हाडाकडून या प्रस्तावांना मंजुरी दिली जाईल.

**१३,८०० उपकरप्राप्त व जुन्या चाळी आणि इमारतींचा पुनर्विकास**

दक्षिण आणि दक्षिण मध्य मुंबईतील १३,८०० जुन्या व मोडकळीस आलेल्या उपकरप्राप्त इमारती साधारणपणे १९७० ते १९९० च्या दरम्यान बांधलेल्या आहेत. बऱ्याच इमारती रस्ता रुंदीकरण, रेल्वे बफर झोन, रोड कटिंग, अरुंद गल्ली किंवा रस्ता यामुळे बाधित होत आहेत. काही इमारती एकल स्वरूपाच्या आहेत. इमारतींचे चाळ मालक अनेक वर्षे संपर्कात नाहीत. भारतात वास्तव्यास नाहीत. बहुसंख्य इमारतींच्या चाळ मालकांनी भाडे वसुलीसाठी प्रतिनिधि नेमलेला आहे. परंतु इमारतींच्या संदर्भात कोणताही निर्णय घेण्याचा अधिकार त्यांना नाही. काही इमारती चाळ मालकांच्या आर्थिक गैरव्यवहारामुळे किंवा वारसाहक्काच्या वादामुळे वर्षानुवर्षे न्यायालयाच्या, कोर्ट रिसिव्हर किंवा कोर्ट लिक्विडेटरच्या ताब्यात आहेत. सुमारे ३५ ते ४० वर्षांपूर्वी तत्कालीन सरकारने चॅप्टर ८ (अ) मधील १०३ (ब) नियमानुसार १०० पट भाडे भरुन चाळीचे मालक व्हा, असा कायदा भाडेकरुंसाठी जाहीर झाला. परंतु, चाळ मालकांनी त्याला विरोध केला. उच्च न्यायालयात चाळ मालकांच्या विरुध्द निर्णय झाल्यानंतर आता गेली चाळीस वर्षे हा खटला सर्वोच्च न्यायालयात प्रलंबित आहे. महायुती शासनाने या उपकरप्राप्त इमारतींच्या पुनर्विकासासाठी २०२२ ला राष्ट्रपतींनी स्वाक्षरी करून म्हाडा कायद्यात ७९ (अ) हा नवीन कायदा आणला. हा कायदाही सर्वोच्च न्यायालयात चाळ मालकांच्या विरोधामुळे प्रलंबित आहे. मुंबईतील चाळीत राहणारा २० ते ३० लाख मध्यमवर्गीय पुनर्विकासापासून वंचित आहे. वर्षानुवर्षे शासन निर्णय कायद्याच्या कचाट्यात अडकून आहेत. मोडकळीस आलेले घर, छोट्याशा खोल्या, गळकी सार्वजनिक शौचालये, अशी या घरांची अवस्था आहे. या शिवाय मोठ्या प्रमाणात मुंबईकर मुंबईबाहेर निघून गेले आहेत. त्यामुळे या बाधित इमारतींचा समावेश या इमारतींच्या आजूबाजूच्या इमारतींच्या पुनर्विकास करता येईल का, या इमारतींच्या जवळच्या परिसरात जर कोणत्याही इमारतींचा पुनर्विकास होणार असेल तर त्या प्रकल्पात या इमारतींचा समावेश बंधनकारक करता येईल का, असा मुद्दा दरेकर यांनी बैठकीत उपस्थित केल्यानंतर ही बाब तपासून घेतली जाईल, असे जैस्वाल यांनी सांगितले.

**बैठकीतील इतर निर्णय**

१) एकल इमारतींचे ४ प्रस्ताव म्हाडाला सादर करण्यात आले असून या प्रस्तावांना एका आठवड्यात म्हाडा मंजुरी प्रदान करील.

२) ३३ (२४) बाबतचा कन्सेंट फॉर्म म्हाडा उपलब्ध करुन देईल.

३) म्हाडा पुनर्विकास योजनेत एकाच मालकाच्या दोन रुम असतील तर पुनर्विकासात एक घर मोफत व एक घर बांधकाम खर्च आकारुन दिले जाते. तेही मोफत मिळावे, ही मागणी म्हाडा तपासून घेण्यात येईल.

४) म्हाडाने ३३ (२४) बाबत महत्वाचा व चांगला निर्णय घेतला आहे. परंत, रहिवाशांना या योजनेची कोणतीही माहिती नाही. या योजनेचा प्रचार व प्रसार रहिवाशांमध्ये होण्यासाठी म्हाडातर्फे इमारतींमध्ये फ्लेक्स लावण्यात येतील.

# उद्धव बाळासाहेब ठाकरे रामबाग शाखेतर्फे ३३ वे श्री दत्तप्रभू जन्मोत्सव

## शिवसेना उपनेते विजय साळवी यांचे आयोजन; कल्याणकर नागरिक होणार हरिनाम सप्ताहात दंग

**दैनिक युवक आधार**

**वार्ताहर/ कल्याण :** कल्याण पश्चिम मधील जागृत देवस्थान श्री दत्त मंदिर तसेच रामबाग शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) शाखा आयोजित व अध्यात्माची कास धरलेले शिवसेनेचे उपनेते विजय साळवी यांच्या मार्गदर्शनाखाली यंदा ३३ वा श्री दत्तप्रभू जन्मोत्सव सोहळा साजरा होणार असून या अखंड हरिनाम सप्ताहाची सुरुवात मार्गशीर्ष शुद्ध ८ अर्थात दि. २८ नोव्हेंबर पासून होणार आहे. या हरिनाम सप्ताहात कल्याणकर नागरिक दरवर्षीप्रमाणे दंग होणार असून या नागरिकांना भक्तीमय वातावरणाची ती एक मोठी संधी मिळणार आहे.

गेली सलग ३३ वर्ष हिंदुहृदयसम्राट वंदनीय बाळासाहेब ठाकरे, गोरगरिबांचे कैवारी धर्मवीर आनंद दिघे या देवतुल्य व गुरुतुल्य अशा व्यक्तींचा आदर्श समोर ठेवून त्यांच्या प्रेरणेने व शिवसेना प्रक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्या आशीर्वादाने तसेच आई सीताबाई ब्राह्मणे, विजय तरुण मंडळाचे प्रमुख विश्वस्त चंद्रकांत (बुवा) पवार यांच्या आठवणींना उजाळा देत अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन करणारे कल्याणमधील जागृत देवस्थान श्री दत्त मंदिराचे मुख्य विश्वस्त विजय साळवी व रामबाग विभागीय शाखा हे धार्मिक कार्य




गेली ३३ वर्ष करत आहेत. महिलांना सुद्धा सन्मान मिळावा व त्यांच्याही कार्याचे कौतुक व्हावे म्हणून गेली पाच वर्ष या अखंड हरिनाम सप्ताह उपक्रमाचे आयोजन महिलांचे नेतृत्व अग्रणी ठेऊन करत आहेत. यंदा या भक्तिमय वातावरणातील उत्सवास शुक्रवार २८ नोव्हेंबरपासून पासून सुरुवात होत आहे, तर या उत्सवाची सांगता ५ डिसेंबर रोजी काल्याचे कीर्तन व महाप्रसाद यांनी होणार आहे. या उत्सवात अखंड हरिनाम सप्ताह, श्रीमद् भागवत कथा, श्री ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण सोहळा व श्री दत्त प्रभू जन्मोत्सव या धार्मिक कार्यक्रमांसह दररोज पहाटे चार ते सहा काकड आरती, सकाळी आठ ते बारा श्री ज्ञानेश्वरी पारायण, दुपारी एक ते तीन महिला भजनी मंडळाचे भजन होणार आहे त्यात सहभागी होणार आहेत कुंदनीकाताई आवटे संचालित (ज्ञानेश्वर प्रसादिक महिला भजनी मंडळ), सुनिताताई म्हात्रे (गुण गोपाळ), कुंदाताई उगले (विठ्ठल रुक्मिणी), बेबीताई हांडे (आत्मोनती विश्वशांती), रामवाडी, मोहने (वारकरी सांप्रदायिक) व लताताई घोटेकर यांचे (कै. कारभारी मास्तर) या महिला भजनी मंडळाचे भजन होणार आहे. त्यानंतर

दुपारी ३ ते ६ श्रीमद् भागवत कथा ही भागवताचार्य ह.भ.प. कान्होपात्राताई शिंदे पाटील हिंगोलीकर या सांगणार आहेत. रात्री साडेआठ ते साडेदहा किर्तन होणार असून यामध्ये दिवा येथील ह.भ.प. आकांक्षाताई महाराज तांडेल, ओतूर, जि. पुणे ह.भ.प. शोभाताई महाराज तांबे, सातारा ह.भ.प. मनीषाताई महाराज घाडगे, जुन्नर जिल्हा पुणे, ह.भ.प. डॉ. मोहिनीताई महाराज पाबळे, नाशिक ह.भ.प. जयाताई महाराज भांगरे, चाकण, पुणे ह.भ.प. सुप्रियाताई महाराज साठे पनवेल येथील ह.भ.प. गीताताई महाराज साठे या महिला कीर्तनकार आपली सेवा बजावणार आहेत. त्यानंतर रात्री ११ नंतर हरिजागर व भजन होणार आहे त्यात गंगागिरी प्रासादिक भजनी मंडळ, संत तुकाराम महाराज भजनी मंडळ, श्री दत्त प्रसादीक भजनी मंडळ, माऊली प्रासादिक भजनी मंडळ, वारकरी सांप्रदाय भजनी मंडळ, विठ्ठल रुक्मिणी सेवा भजनी मंडळ व शेवटी कल्याण शहर वारकरी सांप्रदाय ट्रस्ट महानगर यांचा सामुदायिक जागर होणार आहे.

मंगळवार २ डिसेंबर रोजी श्री गणेश याग व बुधवार ३ डिसेंबर रोजी श्री शक्ती याग आणि ४ डिसेंबर रोजी श्री दत्त जयंती दिनी पहाटे साडेपाच वाजता लघु रुद्र स्वाहाकार यज्ञ व दत्तयाग, ११.३० पूर्णाहुती व महाआरती, १२ नंतर जन्मोत्सव व जन्मोत्सव कीर्तन कीर्तनकार भागवताचार्य ह.भ.प. कान्होपात्राताई शिंदे पाटील हिंगोलीकर यांचे होणार आहे. त्यानंतर दुपारी तीन वाजता समस्त कल्याणकरांचे आकर्षण असलेला श्री दत्तगुरु पालखी सोहळा आयोजित केला आहे. तर शुक्रवार ५ डिसेंबर रोजी सकाळी १० ते १२ या वेळी आळंदी पुणे येथील ह.भ.प. संगीताताई महाराज चोपडे यांचे काल्याचे किर्तन होणार आहे व दुपारी १२ नंतर महाप्रसाद होऊन या कार्यक्रमाची सांगता होणार आहे. तरी कल्याणकर नागरिकांनी उपस्थित राहून मानसिक समाधानाचा आनंद घ्यावा असे आवाहन रामबाग मधील जागृत देवस्थान असलेल्या श्री दत्त मंदिराचे विश्वस्त आणि शिवसेनेचे उपनेते विजय (बंड्या) साळवी यांनी केले आहे.

# महाराष्ट्र मराठी मुक्त पत्रकार संघाच्या अध्यक्षपदी प्रकाश पाटकर यांची सर्वानुमते निवड!

**दैनिक युवक आधार**

**मुंबई (दत्ता खंदारे):** महाराष्ट्र मराठी मुक्त पत्रकार संघाची द्विवार्षिक सर्वसाधारण सभा रविवार दि.२३ नोव्हेंबर रोजी करी रोड येथील बी.आर.दंडवते सभागृहात यशस्वीरित्या पार पडली. यावेळी व्यासपीठावर सभेचे अध्यक्ष प्रकाश पाटकर, निवडणूक अधिकारी सोपान बुडबाडकर,निरीक्षक लहुकुमार तावडे,डॉ एकनाथ नलावडे,ॲड सुनिल शिर्के व इतर मान्यवर उपस्थित होते.

सभेची सुरुवात दीपप्रज्वलन तसेच पत्रकार संघाचे संस्थापक अध्यक्ष कै.अशोक तोडणकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार घालून करण्यात आली. त्यानंतर संघाचे दिवंगत सभासद यांना दोन मिनिटे उभे राहून श्रद्धांजली वाहण्यात आली. सभेच्या सुरुवातीस संघाचे तीन वर्षाचे अहवालाचे वाचन ॲड.नलावडे यांच्याकडून करण्यात आले.

यावेळी प्रकाश पाटकर यांची सर्वानुमते अध्यक्षपदी निवड करण्यात आली.तसेच ॲडव्होकेट सुनील शिर्के



उपाध्यक्ष ,अशोक भोसले प्रमुख कार्यवाह ,डॉ. सूर्यभान डोंगरे संयुक्त कार्यवाह,शशिकांत सावंत संयुक्त कार्यवाह ,श्रीमती छाया गचके खजिनदार , डॉ. एकनाथ नलावडे हिशेब तपासनीस यांची निवड झाली. तर कार्यकारी सदस्य म्हणून विश्वनाथ जगदाळे,महेश्वर तेटांबे,संजय कांबळे,अण्णासाहेब आहेर,अशोक लांडगे,पंकजकुमार पाटील, ज्ञानेश्वर कोरगावकर,रविंद्र नानचे यांची नियुक्ती झाली. तसेच सल्लागार मंडळात प्रभाकर तोडणकर,पंढरीनाथ तामोरे,जगन्नाथ कामत,गुरुनाथ तिरपणकर, अनिल पंडित यांची सर्वांनुमते निवड करण्यात आली.

नवनिर्वाचित अध्यक्ष प्रकाश पाटकर यांनी संघ रौप्य महोत्सवाकडे वाटचाल करत असल्याने यापुढे संघाचे काम उत्साहात व जोरदार पणे पुढे नेणार असल्याचे सांगत त्यासाठी सर्वांचे सहकार्य, पाठबळ आवश्यक असल्याचे प्रामाणिकपणे नमूद केले. यावेळी काही सदस्यांनी संस्थेला सढळ हस्ते देणगी देत असल्याचे जाहीर केले. यावेळी नवनिर्वाचित सभासद यांचा शाल व पुष्प गुच्छ देऊन यथोचित सन्मान करण्यात आला. कार्यक्रमाचे नेटके सूत्रसंचालन डॉ.सूर्यभान डोंगरे व श्रीमती छाया गचके यांनी केले. .

# मुंबईतील कनेक्टिव्हिटीचे प्रकल्प युद्धपातळीवर पूर्ण करण्यात येणार –मुख्यमंत्री फडणवीस

## आयआयएमयूएन आयोजित 'युथ कनेक्ट' कार्यक्रमात मुख्यमंत्र्यांचे प्रतिपादन

**दैनिक युवक आधार**

**मुंबई :** मुंबईतील वाहतूक व्यवस्था सुधारण्यासाठी विविध पायाभूत प्रकल्पांची कामे आगामी पाच वर्षात पूर्ण करण्यात येणार असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले. मुंबईच्या पूर्व-पश्चिम तसेच उत्तर-दक्षिण जोडणीला वेग देणार, अनेक महत्त्वाचे प्रकल्प युद्धपातळीवर पूर्ण करण्यात येणार आहेत.

मुंबईतील वरळी डोम येथे इंडियाज् इंटरनॅशनल मूव्हमेंट टू युनाईट नेशन्स (आयआयएमयूएन) आयोजित 'यूथ कनेक्ट' कार्यक्रमात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस बोलत होते.मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, सी-लिंकचा वर्सोवा-दहिसर-भाईंदरपर्यंत विस्तार, दहिसरकडील नवीन लिंक रोड, फ्री-फ्लो ब्रिजेस, तसेच विविध टनेल प्रकल्पांमुळे मुंबईतील वाहतूक कोंडी मोठ्या प्रमाणात कमी होईल. सध्या मुंबईतील 60 टक्के वाहतूक पश्चिम द्रुतगती मार्गावर असल्याने या क्षेत्राला पर्याय उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

बीकेसी ते इतर भागांना जोडणारे बोगदे, नवीन लिंक रोड नेटवर्क, ओव्हर एक्स्प्रेसवे कनेक्शन आदी प्रकल्पांमुळे शहरातील प्रवासाचा सरासरी वेग मोठ्या प्रमाणात वाढेल. मुंबईत पूर्णत: बोगदे रस्ते तयार करण्यात येणार आहेत. पुढील पाच वर्षात मेट्रोचे संपूर्ण जाळे तयार होणार आहे. हे प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर मुंबईतील सार्वजनिक वाहतूक अधिक सक्षम आणि वापरण्यास सोपी बनेल. 'मुंबई वन' हा एकात्मिक मोबिलिटी ॲप नागरिकांसाठी वन-स्टॉप सोल्युशन असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी नमूद केले.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, पालकांमध्ये खासगी शाळांविषयी आकर्षण वाढल्याने शासकीय व महानगरपालिका शाळांची संख्या कमी होत आहेत असे चित्र समोर आले. परंतु वास्तवात परिस्थिती बदलत आहे. महानगरपालिकांच्या शाळांना आंतरराष्ट्रीय मानकांपर्यंत नेण्याचा संकल्प असून मुंबई महानगरपालिकाकडे ती क्षमता आहे. शासकीय शाळांना योग्य प्रशिक्षण, अध्यापन पद्धती आणि पायाभूत सुविधा दिल्यास त्या खासगी शाळापेक्षा सरस ठरतील, असेही मत त्यांनी यावेळी व्यक्त केले.

लोकशाही अधिक सक्षम आणि सर्व समावेशक करण्यासाठी युवांचा सहभाग अत्यावश्यक आहे. आजच्या लोकशाहीत युवा नागरिक फक्त दर्शक नसून स्वत:चे मत असलेले महत्त्वाचे स्टेकहोल्डर्स आहेत. युवांच्या मतांना स्थान दिल्याशिवाय लोकशाहीची प्रक्रिया पुढे जाऊ शकत नसल्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, पर्यावरण बदल ही केवळ पुस्तकी चर्चा नसून वास्तवातील मोठी समस्या आहे. आपण हवामान बदलाचा अनुभव घेणारी पहिली पिढी आहोत आणि त्याबद्दल काहीतरी करू शकणारी शेवटची पिढी आहोत. सार्वजनिक वाहतूक व्यवस्था ही प्रदूषणाची सर्वात मोठी कारणे असतात, त्यामुळे मुंबईत वाहतूक व्यवस्था इलेक्ट्रिक करण्याचे प्रयत्न सुरू आहेत. मेट्रो संपूर्णपणे इलेक्ट्रिक आहे. पुढील टप्प्यात सार्वजनिक वाहतुकीला पूर्णपणे शून्य-उत्सर्जनच्या दिशेने नेणार असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, अनेक वर्षे मुंबईचे सांडपाणी थेट समुद्रात सोडले जात होते, मुंबईसारख्या महानगराचा 100 टक्के सीवेज समुद्रात टाकला जाणे योग्य नाही. त्यामुळे नियम तयार करून आता संपूर्ण मुंबईत सीवेज ट्रीटमेंट प्लांट्स उभारत आहोत. पुढील वर्षापर्यंत 100 टक्के ट्रीटेड पाणीच समुद्रात सोडले जाईल. त्याचबरोबर धारावीच्या पुनर्विकासात 30 टक्के क्षेत्र पूर्णपणे अनडेव्हलपेबल ठेवले जाणार असून त्यामुळे प्रचंड प्रमाणात ओपन आणि ग्रीन स्पेसेस निर्माण होणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

# सिंबॉल ऑफ नॉलेज आणि डॉ बाबासाहेब आंबेडकर युवा युवती संघटना माणगांव यांच्या संयुक्त विद्यमाने २६ नोव्हेंबर रोजी संविधान दिनाचे आयोजन

**दैनिक युवक आधार**

**बोरघर / माणगाव :** सिंबॉल ऑफ नॉलेज डॉ. बाबासाहेब आंबेडकर युवा युवती संघटना माणगांव यांच्या संयुक्त विद्यमाने बुधवार दिनांक २६ नोव्हेंबर २०२५ रोजी लोकनेते अशोकदादा साबळे विद्यालय माणगाव येथे संविधान दिनाचे आयोजन करण्यात आले आहे.

सदर कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून मा. ॲड. राजीवजी साबळे अध्यक्ष माणगाव शिक्षण प्रसारक मंडळ, माणगाव पोलिस निरीक्षक मा. श्री. निवृत्ती बोऱ्हाडे मार्गदर्शन सायबर क्राईम वाहतूक विभाग, व माणगाव तालुक्यातील बौद्धजन पंचायत समितीचे पदाधिकारी आणि विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

**मार्गदर्शन सायबर क्राईम, वाहतुक नियम**

सदर कार्यक्रमास प्रमुख वक्त्या ॲड. समिक्षा साळवी या भारतीय संविधानामुळे महिलांना मिळालेला सन्मान या विषयावर उपस्थितांना सखोल मार्गदर्शन करणार आहेत.

कार्यक्रमाची रूपरेषा - सकाळी ८.३० वाजता राष्ट्रगीत, संविधान प्रस्तावना सामुहिक वाचन,भारतीय शहिदांना श्रध्दांजली. त्या नंतर सकाळी ९ ते १०.३० वाजता भारतीय संविधान सन्मान भव्य




रॅली. त्या नंतर सकाळी ११ ते १२ वाजता मान्यवरांचे स्वागत, मनोगत आणि बक्षीस समारंभ त्या नंतर दुपारी १२ ते १.३० वाजता भारतीय संविधान या विषयावर प्रमुख वक्त्यांचे मार्गदर्शन. त्या नंतर निबंध स्पर्धा स्पर्धेमधील विषय खालील प्रमाणे-

दुपारी १.३० ते २.३० वाजता इयत्ता ५ वी ते ८ वी - संविधानाने दिलेले मुलभूत अधिकार. इयत्ता ९ वी ते १२ वी संविधानातील स्त्रीयांचे हक्क आणि अधिकार. खुला गट - संविधानातील प्रतिनिधीत्व हक्क (रिझर्वेशन). दुपारी ३.०० वाजता कार्यक्रमाचा समारोप होईल. तरी सदर कार्यक्रमास मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे सिंबॉल ऑफ नॉलेज आणि डॉ बाबासाहेब आंबेडकर युवा, युवती संघटना माणगांव यांनी आपल्या प्रसिद्धी पत्रकात म्हटले आहे.

# डॉ. एन. एम. जाधव फाउंडेशनच्या इंटेलेक्च्युअल स्पेशल स्कूलच्या विद्यार्थ्यांसोबत खेळ, कौशल्याधारित उपक्रम व संवादात्मक सत्र

**दैनिक युवक आधार**

**संतोष आमले :** के. एल. ई. सोसायटी'स सायन्स अँड कॉमर्स कॉलेज, कळंबोली यांच्या युथ रेड क्रॉस विंग असोसिएशन तर्फे डॉ. एन. एम. जाधव फाउंडेशनच्या इंटेलेक्च्युअल स्पेशल स्कूल, न्यू पनवेल येथील विद्यार्थ्यांसाठी एक संवादात्मक, कौशल्यविकासाभिमुख व आनंददायी उपक्रमाचे आयोजन करण्यात आले. या उपक्रमाचा उद्देश महाविद्यालयीन स्वयंसेवकांमध्ये सहानुभूती, सामाजिक जबाबदारी व मानवतावादी मूल्यांची जडणघडण करणे तसेच विशेष मुलांना आनंद, प्रोत्साहन आणि कौशल्यविकासासाठी संधी उपलब्ध करून देणे हा होता.






हा कार्यक्रम प्राचार्य प्रो. (डॉ.) विजय डी. मेंधुलकर, के. एल. ई. सोसायटी'स सायन्स अँड कॉमर्स कॉलेज, कळंबोली आणि सौ. श्रेया जाधव, डॉ. एन. एम. जाधव फाउंडेशन, न्यू पनवेल यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आला. कार्यक्रमाचे सर्वांगीण मार्गदर्शन व संयोजन डॉ. शशिकला प्रजापती, अध्यक्षा, युथ रेड क्रॉस विंग असोसिएशन, के. एल. ई. सोसायटी'स **सायन्स अँड कॉमर्स कॉलेज, कळंबोली यांनी केले.**

**कार्यक्रमामध्ये विद्यार्थ्यांसाठी खालीलप्रमाणे विविध उपक्रम राबविण्यात आले :**

■ खेळाधारित आयसब्रेकर उपक्रम – विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास वाढवणे, परस्पर संवाद वाढवणे व समन्वय क्षमता विकसित करणे.

■ कौशल्याधारित क्रियाकलाप – सूक्ष्म हालचालींचा विकास, इंद्रियानुभव वाढवणे आणि मूलभूत जीवनकौशल्ये विकसित करण्यासाठी विविध कृती.

■ ओरिगामी (कागद घड्या) उपक्रम – सोप्या कागदाच्या घड्यांद्वारे सर्जनशीलता, लक्ष केंद्रित करणे आणि हात–डोळा समन्वय विकसित करणे.

■ गाठी बांधण्याचे प्रात्यक्षिक (कॉट-टायिंग) – विविध साध्या गाठी शिकवून एकाग्रता, संयम आणि व्यावहारिक ज्ञान वाढविणे.

■ रंगभरणाचे उपक्रम – विविध चित्रांमध्ये रंग भरण्याद्वारे कल्पनाशक्ती, रंगांची जाणीव व स्व-अभिव्यक्तीची संधी उपलब्ध करून देणे.

■ संवादकौशल्यविकास उपक्रम – साधे संवाद, हावभाव, अभिव्यक्ती आधारित खेळ यांद्वारे मौखिक व अमौखिक संवादकौशल्य विकसित करणे.

संपूर्ण सत्रादरम्यान युथ रेड क्रॉसचे स्वयंसेवक विद्यार्थ्यांसोबत एक-एक करून संवाद साधत होते. विशेष मुलांना प्रोत्साहन, धीर व प्रेमळ मार्गदर्शन देत प्रत्येक उपक्रमात त्यांचा सक्रिय सहभाग घडवून आणण्यात आला. वातावरण सतत आनंदी, उत्साही आणि सर्वसमावेशक राहिले.

प्राचार्य प्रो. (डॉ.) विजय डी. मेंधुलकर यांनी युथ रेड क्रॉस विंग असोसिएशनच्या या उपक्रमाचे कौतुक केले व अशा उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांमध्ये करुणा, संवेदनशीलता आणि सामाजिक बांधिलकीची जाणीव दृढ होते असे नमूद केले. सौ. श्रेया जाधव यांनी विशेष मुलांच्या सर्वांगीण विकासासाठी अशा प्रकारचे संयुक्त उपक्रम अत्यंत महत्त्वाचे असल्याचे मत व्यक्त करीत महाविद्यालयीन टीमचे आभार मानले.

अध्यक्षा डॉ. शशिकला प्रजापती यांनी युथ रेड क्रॉस विंग असोसिएशनचा उद्देश केवळ महाविद्यालयाच्या चार भिंतींपुरता मर्यादित नसून, समाजातील विशेष घटकांपर्यंत मानवतावादी कार्यांचा विस्तार करणे हा असल्याचे सांगितले. महाविद्यालय व विशेष शाळा यांच्यामधील असे सेतूबंध निर्माण करणारे कार्यक्रम अधिक समावेशक, संवेदनशील आणि सुसंस्कृत समाज निर्मितीस हातभार लावतात, असे त्यांनी आपल्या भाषणात नमूद केले.


कार्यक्रमाच्या शेवटी के. एल. ई. सोसायटीचे माननीय पदाधिकारी, के. एल. ई. सोसायटी'स सायन्स अँड कॉमर्स कॉलेज, कळंबोली येथील सर्व प्राध्यापकवृंद व स्वयंसेवक, तसेच डॉ. एन. एम. जाधव फाउंडेशनच्या इंटेलेक्च्युअल स्पेशल स्कूल, न्यू पनवेल येथील संपूर्ण टीम यांचे मनःपूर्वक आभार मानण्यात आले. या उपक्रमातून विशेष मुलांसाठी आनंद, सहभाग आणि कौशल्यविकास तर साध्य झाला, तसेच महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठीही हा एक समृद्ध, संवेदनशील आणि प्रेरणादायी अनुभव ठरला.

# कामोठे मधील वाढत्या वाहतूक कोंडी व अनियमित पार्किंगबाबत तातडीने कार्यवाही करण्याबाबत शिवसेनेची महापालिकेकडे निवेदनाद्वारे मागणी

**दैनिक युवक आधार**

**पनवेल (वार्ताहर):** कामोठे सेक्टर ३४ व ३५ परिसरात मालवण तडका आणि नीलकंठ हॉटेलच्या प्रवेशद्वाराजवळ दररोज गंभीर स्वरूपाची वाहतूक कोंडी होत आहे. रस्त्याची रुंदी कमी असतानाही दोन्ही बाजूंना अनियमितपणे वाहनांची पार्किंग होत असल्याने नागरिकांना मोठ्या गैरसोयीचा सामना करावा लागत आहे. याबाबत शिवसेना उप शहर प्रमुख कामोठे सचिन त्रिमुखे यांनी वाढत्या वाहतूक कोंडी व अनियमित पार्किंगबाबत तातडीने कार्यवाही करण्याबाबत




॥ जय भवानी ॥ ॥ जय शिवाजी ॥
शिवसेना
श्री सचिन मनोहर त्रिमुखे
शिवसेना उपशहर प्रमुख कामोठे शहर
मो. ९८७०४४५४४७
शिवसेना मध्यवर्ती कार्यालय-जुई आर्केड बिल्डींग समोर, मानसरोवर स्टेशन रोड, कामोठे, नवी मुंबई ४१०२०९
संदर्भ क्र. SN/BN/058 ता. 24/11/2025
प्रति,
मा आयुक्त, श्री. मंगेश चितळे साहेब,
पनवेल महानगरपालिका,
विषय : सेक्टर ३४ व ३५ परिसरातील वाढत्या वाहतूक कोंडी व अनियमित पार्किंगबाबत तातडीने कार्यवाही करण्याबाबत
मा.-महोदय,
यांस सस्नेह जय महाराष्ट्र
सेक्टर ३४ व ३५ परिसरात मालवण तडका आणि नीलकंठ हॉटेलच्या प्रवेशद्वाराजवळ दररोज गंभीर स्वरूपाची वाहतूक कोंडी होत आहे. रस्त्याची रुंदी कमी असतानाही दोन्ही बाजूंना अनियमितपणे वाहनांची पार्किंग होत असल्याने नागरिकांना मोठ्या गैरसोयीचा सामना करावा लागत आहे.
विशेषतः पाणवळ्याच्या समोर रस्त्यावर चारचाकी आणि दुचाकी वाहने अनधिकृतपणे उभी केल्यामुळे मार्ग अत्यंत अरुंद होऊन वाहतूक ठप्प होते. अनेक वेळा अपघाताच्या घटना टळल्या आहेत. यामुळे दैनंदिन वाहतूक पूर्णपणे विस्कळीत होत असून पादचारी, शाळकरी मुले व जेष्ठ नागरिकांना धोका निर्माण झाला आहे.
वरील परिस्थिती गंभीर असल्याने पनवेल महानगर पालिकाच्या संबंधित विभागामार्फत खालीलप्रमाणे तातडीने कार्यवाही होणे अत्यावश्यक आहे :
1. अनियमित व अनधिकृत पार्किंगवर दंडात्मक कारवाई
2. परिसरात योग्य व अधिकृत पार्किंग झोनची व्यवस्था
3. वाहतूक व्यवस्थेसाठी आवश्यक मार्गदर्शक फलक, नो-पार्किंग चिन्हे व रेषांकन
4. रस्त्याच्या दोन्ही बाजूंवरील अडथळे व अतिक्रमण तातडीने हटवणेही समस्या मागील अनेक दिवसांपासून कायम असून नागरिकांना प्रचंड त्रास होत आहे. म्हणून पनवेल महानगर पालिका मार्फत त्वरित प्रत्यक्ष पाहणी करून आवश्यक ती उपाययोजना करण्यात यावी, ही विनंती.
आपण लवकरात लवकर कार्यवाही कराल, अशी पूर्ण अपेक्षा आहे. धन्यवाद
श्री रामदास गोवारी, शिवसेना शहरप्रमुख कामोठे
श्री मधुमती सचिन त्रिमुखे, समाज सेविका
श्री सचिन मनोहर त्रिमुखे, शिवसेना उपशहर प्रमुख कामोठे शहर

पनवेल महापालिइकचे आयुक्त मंगेश चितळे यांना निवेदन दिले आहे

पाणवळयाच्या समोर रस्त्यावर चारचाकी आणि दुचाकी वाहने अनधिकृतपणे उभी केल्यामुळे मार्ग अत्यंत अरुंद होऊन वाहतूक ठप्प होते. अनेक वेळा अपघाताच्या घटना टळल्या आहेत. यामुळे दैनंदिन वाहतूक पूर्णपणे विस्कळीत होत असून पादचारी, शाळकरी मुले व जेष्ठ नागरिकांना धोका निर्माण झाला आहे. याबाबत पनवेल महापालिकेच्या संबंधित विभागाने अनियमित व अनधिकृत पार्किंगवर दंडात्मक कारवाई, परिसरात योग्य व अधिकृत पार्किंग झोनची व्यवस्था, वाहतूक व्यवस्थेसाठी आवश्यक मार्गदर्शक फलक, नो-पार्किंग चिन्हे व रेषांकन आणि रस्त्याच्या दोन्ही बाजूंवरील अडथळे व अतिक्रमण तातडीने हटवण्याचाही मागणी करण्यात आली आहे. ही समस्या मागील अनेक दिवसांपासून कायम असून नागरिकांना प्रचंड त्रास होत आहे. म्हणून पनवेल महानगर पालिका मार्फत त्वरित प्रत्यक्ष पाहणी करून आवश्यक ती उपाययोजना करण्यात यावी, ही विनंती.

शिवसेना उप शहर प्रमुख सचिन त्रिमुखे आणि समाज सेविकामधुमती त्रिमूखे यांनी आयुक्त मंगेश चितळे यांना निवेदन दिले आहे. यावेळी शिवसेना शहर सह संघटक संतोष गोळे, युवासेना महानगर अधिकारी महेश भिसे, माजी उपशहर प्रमुख बाळ मंचेकर यांच्यासह शिवसैनिक उपस्थित होते.

# महानगरपालिका प्रारुप मतदार याद्यांच्या हरकतीची मुदत १५ दिवसांनी वाढवा

## महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे राज्य निवडणूक आयोगाला पत्र

**दैनिक युवक आधार**

**मुंबई / प्रतिनिधी :** राज्यातील महानगरपालिका निवडणुकांसाठी प्रारुप मतदार यादी २० नोव्हेंबर २०२५ रोजी जाहिर झाली असून या याद्यांवर हरकती व सूचना घेण्यासाठी २७ नोव्हेंबर २०२५ पर्यंतची मुदत देण्यात आली आहे. बऱ्याच महानगरपालिकांमध्ये प्रारुप मतदार याद्यांवर हरकत व सूचना घेण्यासाठी मुदत वाढविण्याची आवश्यकता असून अवघी ७ दिवसांची मुदत अत्यंत कमी आहे, ती १५ दिवसांनी वाढवून द्यावी, अशी मागणी महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीने केली आहे.काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ, विधिमंडळ काँग्रेस पक्षनेते विजय वडेट्टीवार व विधान परिषद गटनेते सतेज ऊर्फ बंटी पाटील यांनी राज्य निवडणूक आयोगाला पाठवलेल्या संयुक्त पत्रात असे म्हटले आहे की, बऱ्याच महानगरपालिकांमध्ये प्रारुप मतदार याद्या प्रभागनिहाय योग्य पद्धतीने फोडलेल्या नाहीत, बऱ्याच मतदारांची नावे राहत असलेल्या भागांतून इतर भागांमध्ये गेलेली आहेत, ही संख्या मोठ्या प्रमाणावर आहे. हरकती घेण्याची पद्धत देखील अत्यंत किचकट असून प्रत्येक व्यक्तीने विहित नमुन्यात अर्ज करावयाचा असून सोबत आधारकार्ड जोडायचे आहे, ही पद्धत किचकट व वेळकाढू आहे. कोणत्याही व्यक्ती वा राजकीय पक्षाने निवडणुकीच्या सक्षम अधिकाऱ्याच्या निदर्शनास योग्य ती हरकत व सूचना आणून दिल्यास अनेक व्यक्तींबद्दलीची तक्रार स्विकारली पाहिजे, आज तसे होताना दिसत नाही. मतदार याद्यांबाबत स्पष्टता व पारदर्शकता येण्यासाठी राजकीय पक्षांच्या व प्रत्येक नागरिकांच्या तक्रारींची नोंद घेणे आवश्यक आहे. प्रभागातील नागरिकांची संख्या देखील मोठ्या प्रमाणावर असल्याने मतदार याद्या तपासण्यास वेळ लागणार आहे म्हणून वेळ वाढवून द्यावी.

# प्रियदर्शिनी इंग्लिश मीडियम स्कूलमध्ये वक्तृत्व स्पर्धा; ओळखा मी कोण? स्पर्धा उत्साहात पार पडल्या

**दैनिक युवक आधार**

**सणसर :-** विकास क्षत्रिय : इंदापूर शहरातील प्रियदर्शिनी इंग्लिश मीडियम स्कूल अँड ज्युनिअर कॉलेजमध्ये वक्तृत्व स्पर्धा आणि 'ओळखा पाहू मी कोण' या स्पर्धा पार पडल्या यावेळी संस्थेचे व्हा. चेअरमन आदरणीय इम्रान शेख सर प्राचार्य सुधीर भिसे सर उपस्थित होते.वक्तृत्व स्पर्धेमध्ये इयत्ता पाचवी ते दहावीच्या 60 विद्यार्थ्यांनी भाग घेतला होता.यामध्ये भाग घेतलेल्या सर्व विद्यार्थ्यांनी विविध विषयांवर भाषणआणि विविध विषयांवर आपले मत व्यक्त केले.या स्पर्धा घेण्याचा उद्देश विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास आणि भाषा कौशल्याचा विकास वाढवणे हा होता असे मत यावेळी प्राचार्य सुधीर भिसे सर यांनी केले. या स्पर्धेत विद्यार्थी एका विशिष्ट



विषयावर इंग्रजीमध्ये भाषण देतात. या स्पर्धेचा उद्देश विद्यार्थ्यांना सार्वजनिक भाषणाचे कौशल्य विकसित करणे आहे,जेणेकरून ते आत्मविश्वासाने आणि प्रभावीपणे बोलू शकतील त्यानंतर इयत्ता पहिली ते चौथी या वर्गांमध्ये ओळखा पाहू मी कोण स्पर्धा (Guess Who Am I? Competition) ही स्पर्धा घेण्यात आली ही एक मजेदार आणि शैक्षणिक स्पर्धा आहे ज्यामध्ये शिक्षक एखाद्या प्रसिद्ध व्यक्तीबद्दल,वस्तू किंवा ठिकाणाबद्दल माहिती देतात,प्रसिद्ध व्यक्ती तसेच प्राणी,पक्षी यांचे आवाज ओळखायला लावतात. जनरल नॉलेजचे प्रश्न विचारतात या स्पर्धेमुळे विद्यार्थ्यांच्या सामान्य ज्ञानामध्ये आणि तर्क क्षमतेमध्ये वाढ होते.यावेळी या स्पर्धेमध्ये भाग घेतलेल्या सर्व विद्यार्थ्यांचे संस्थेचे चेअरमन मा.पी.जी.नायर सर यांनी कौतुक केले सूत्रसंचालन सौ.कुलकर्णी मॅडम,सौ.खान मॅडम कु.नलवडे मॅडम सौ.योगिता मॅडम यांनी स्पर्धेचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन केले.

# उत्तर महाराष्ट्र वकील क्रिकेट स्पर्धेत अहिल्यानगर विजेता; निफाडचा दमदार उपविजय

**दैनिक युवक आधार**

**नाशिक जिल्हा प्रतिनिधी राहुल कुलकर्णी**

**निफाड :** उत्तर महाराष्ट्र विभागीय वकिलांच्या लेदर बॉल क्रिकेट स्पर्धेला जळगाव येथे उत्साहात सुरुवात झाली असून स्पर्धेचा थरारक अंतिम सामना अहिल्यानगर आणि निफाड ग्लॅडिएटर्स यांच्यात रंगला. या रोमांचक सामन्यात अहिल्यानगर संघाने बाजी मारत विजेतेपद पटकावले, तर निफाड ग्लॅडिएटर्स संघ उपविजेता ठरला.

जळगाव वकील संघाच्या वतीने अ‍ॅड. राजेश झाल्टे, अ‍ॅड. ओम त्रिवेदी आणि अ‍ॅड. सागर चित्रे यांनी स्पर्धेचे यशस्वी आयोजन केले. नंदुरबार, शहादा, नाशिक, अहिल्यानगर, जळगावचे तीन संघ, धुळे आणि निफाड अशा एकूण नऊ संघांनी या विभागीय स्पर्धेत उत्स्फूर्त सहभाग नोंदवला.

नियमानुसार प्रत्येक संघास तीन साखळी सामने खेळविण्यात आले. त्यातून अहिल्यानगर, जळगाव स्पार्टन्स, जळगाव बाबा इलेव्हन आणि निफाड ग्लॅडिएटर्स हे चार संघ उपांत्यपूर्व फेरीसाठी पात्र ठरले.

उपांत्य सामन्यात अहिल्यानगरने जळगाव बाबा इलेव्हनचा पराभव केला, तर दुसऱ्या सामन्यात निफाड ग्लॅडिएटर्सने जळगाव स्पार्टन्सवर मात करत अंतिम फेरी गाठली. अंतिम सामन्यात अहिल्यानगर संघाने दमदार खेळ करून विजेतेपद मिळविले.

निफाड ग्लॅडिएटर्सचे कर्णधार अ‍ॅड. श्रीकांत रायते यांच्या नेतृत्वाखाली अ‍ॅड. विजय मोगल, अ‍ॅड. शरद नवले, अ‍ॅड. राजेंद्र सोनवणे, अ‍ॅड. पवन कोचर, अ‍ॅड. सुरज कोल्हे, अ‍ॅड. चेतन ठोंबरे, अ‍ॅड. दीपक पवार, अ‍ॅड. प्रमोद पाटील, अ‍ॅड. आदित्य जाधव, अ‍ॅड. सिद्धार्थ झोटिंग, अ‍ॅड. भूषण जैन, दर्शन सोनवणे आणि गणेश भडकवाड यांनी



उल्लेखनीय कामगिरी केली.

निफाड संघातील जायवर्धन पंचभाई यांना स्पर्धेतील सर्वोत्कृष्ट फिल्डर म्हणून गौरविण्यात आले.

या यशाबद्दल नाशिक जिल्हा अ‍ॅडव्होकेट फेडरेशन असोसिएशनचे अध्यक्ष अ‍ॅड. इंद्रभान रायते तसेच निफाड वकिल संघाचे अध्यक्ष अ‍ॅड. प्रविण ठाकरे, उपाध्यक्ष अ‍ॅड. रामनाथ सानप, सचिव अ‍ॅड. रामनाथ शिंदे, खजिनदार अ‍ॅड. केशव शिंदे आणि सर्व सभासदांनी विजेत्या आणि उपविजेत्या संघांचे अभिनंदन केले.

# केरेन सुवर्णा यांचा "सप्टेंबर 21" इफ्फी गोवा 2025 मध्ये झळकला!

**दैनिक युवक आधार**

**गोवा वार्ताहर** : 22 वर्षांच्या युवा फिल्ममेकर केरेन क्षिती सुवर्णा यांच्या दिग्दर्शनाखालील "सप्टेंबर 21" आता जागतिक प्रेक्षकांसाठी एक हृदयस्पर्शी सिनेमॅटिक अनुभव घेऊन आली आहे. ही फिल्म एनएफडीसीच्या फिल्म बाजारातील प्रतिष्ठित व्ह्यूइंग रूममध्ये प्रदर्शित झाली, जे ५६ व्या भारतीय आंतरराष्ट्रीय फिल्म महोत्सव (इफ्फी) २०२५, गोवा दरम्यान आयोजित करण्यात आले.

चित्रपटाने आधीच मोठी चर्चा निर्माण केली असून, या वर्षाच्या क्युरेटेड यादीतील सर्वाधिक प्रतिक्षित चित्रपटांपैकी एक ठरला आहे. "सप्टेंबर 21" हा एक तीव्र भावनिक नाट्यचित्र आहे, जो अल्झायमरच्या आजाराची दुनिया आणि त्यासोबतच्या केअरगिव्हिंगच्या अदृश्य संघर्षांना अत्यंत मानवी, सहज आणि वास्तवदर्शी पद्धतीने मांडतो. स्मरणशक्ती हरवत चाललेल्या व्यक्ती आणि त्यांची काळजी घेणाऱ्यांमध्ये निर्माण होणारा निस्वार्थ, जिव्हाळ्याचा आणि भावनिक संबंध चित्रपट अतिशय संवेदनशीलतेने



दाखवतो. केअरगिव्हिंगशी निगडित मानसिक, भावनिक आणि सामाजिक परिणामांवरही चित्रपट प्रकाश टाकतो, जे अनेकदा दुर्लक्षित राहतात.

कथानक एका वृद्ध व्यक्तीच्या प्रवासावर आधारित आहे, ज्यांना अल्झायमरचे निदान झाले आहे. ही भूमिका प्रवीण सिंग सिसोदिया यांनी अत्यंत प्रभावी आणि वास्तविकतेने सजवली आहे.

त्यांच्या सोबत प्रियंका उपेंद्र कमलाच्या भूमिकेत दिसतात एक समर्पित केअरगिव्हर जी कर्तव्य, करुणा आणि भावनिक नात्यांमध्ये सातत्यानं समतोल राखताना दिसते. दोघांच्या अभिनयामुळे चित्रपटाचा भावनिक पाया अधिक ठोस बनतो.

चित्रपटात झरीना वहाब, अमित बेहल, अजित शिधये, रिकी रुद्रा, विनी, आणि सचिन पाटेकर यांच्या भूमिकादेखील महत्त्वपूर्ण आहेत. अल्झायमरचा परिणाम फक्त रुग्णापुरता मर्यादित न राहता कुटुंब, नातेसंबंध आणि संपूर्ण केअरगिव्हिंग व्यवस्थेपर्यंत पोहोचतो, हे चित्रपट प्रभावीपणे दाखवतो.

युवा दिग्दर्शक केरेन क्षिती सुवर्णा विषयाला विलक्षण परिपक्वता, संवेदनशीलता आणि प्रामाणिकतेने हाताळतात. चित्रपटाचा हेतू केवळ कथा सांगणे नसून समाजात जागरूकता, समज आणि संवाद वाढवणे हा आहे.

चित्रपटाचे निर्मितीकरण हमारा मूव्ही, एफएमडी विसिका फिल्म्स आणि फिल्म्स मॅक्स यांनी केले आहे.

कथा राज शेखर यांनी लिहिली असून, चित्रपटाचे संवाद भूपेंद्रकुमार नंदन आणि विनय सांडिल्य यांनी लिहिले आहेत. संगीत विनय चंद्रा यांनी दिले असून, ते चित्रपटाच्या भावनांना आणखी खोलवर नेतं.फिल्म बाजारातील प्रदर्शना नंतर, "सप्टेंबर 21" चा २०२६ च्या सुरुवातीला प्रदर्शित होण्याचा अंदाज आहे.

# उपक्रमशील शिक्षिकेने नवोपक्रमाने विद्यार्थ्यांना दिले वाचनाचे धडे

**दैनिक युवक आधार**

**पालघर :- (प्रमोद तरळ) :** जिल्हा परिषद शाळा शिगाव येथे नव्याने रूजू झालेल्या शिक्षिका सौ. शितल हर्षल संखे या नेहमीच विविध उपक्रम राबवून विद्यार्थ्यांना वर्गात आनंददायी शिक्षण देण्यासाठी तत्पर असतात. त्यांनी शिगावला रूजू झाल्यावर विद्यार्थ्यांना निपुण पालघर व निपुण महाराष्ट्र उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांचा वाचन सराव सुरू केला . शिगाव शाळेत येणारे विद्यार्थी तळागाळातून येतात. तसेच वेगवेगळ्या आदिवासी पाड्यावरून येणाऱ्या विद्यार्थ्यांना शाळा व घर याव्यतिरिक्त दुसरे जग बहुदा माहित ही नसते . म्हणून सदर विद्यार्थ्यांना सर्व माहिती मिळेल यासाठी एक नवोपक्रम वर्गात सुरू करण्यात आला.

"वर्तमानपत्रातून वाचन व ज्ञान वृद्धिंगत करणे" असे या उपक्रमाचे नाव आहे. अशा प्रकारचा उपक्रम सुरू करून त्या उपक्रमात विविध छोटे छोटे सृजनशील उपक्रम जोडत शिक्षिका सौ. शितल हर्षल संखे यांनी विद्यार्थ्यांना अभ्यासा विषयी एक वेगळी दिशा दाखवत. खूप सारा वाचनाचा सराव विविध



नवीन शब्दांचा सराव तसेच जोडाक्षरांचा आणि वर्तमानपत्रातील विविध बातम्यांनी विद्यार्थ्यांच्या ज्ञानात व बाहेरच्या जगा विषयी उत्सुकता निर्माण केली व त्यांची ज्ञानाची तहान भागवण्याचा एक छान सकारात्मक प्रयत्न केला. त्यांच्या या उपक्रमाला विद्यार्थी पालक व अधिकारी वर्ग यांनी भरभरून कौतुक केले. चला तर मग ज्ञानामृत प्राशन करूया... वाचन समृद्ध होवूया .

# अपोलोने महाराष्ट्रात पुणे येथे तिसरे रुग्णालय सुरु केले ४०० बेड्सची क्षमता असलेले हे रुग्णालय; क्वाटर्नरी देखभाल सेवासुविधा प्रदान करेल

**दैनिक युवक आधार**
**पुणे, प्रतिनिधी :** आशियातील आघाडीची एकात्मिक आरोग्य सेवा प्रदान करणारी संस्था, अपोलो हॉस्पिटल्सने आज पुण्यातील स्वारगेट येथे आपले नवे हॉस्पिटल सुरु केले. या हॉस्पिटलची सुरुवात टप्प्याटप्प्याने होईल, सध्या २५० बेड्स उपलब्ध आहेत. राज्यातील या भागात आरोग्य देखभाल गरजांना ध्यानात ठेवून त्या पूर्ण करण्यासाठी आरोग्य सेवा क्षमता अजून जास्त वाढवण्याची अपोलो हॉस्पिटल्सची योजना आहे.

अपोलो हॉस्पिटल्स ग्रुपचे अध्यक्ष डॉ प्रताप सी रेड्डी यांनी सांगितले,"अपोलोमध्ये आमचे मिशन आहे, भारताच्या बरोबरीने संपूर्ण जगासाठी आरोग्य सेवांमध्ये परिवर्तन घडवून आणणे. 'हील इन इंडिया - हील बाय इंडिया' व्हिजनने प्रेरित होऊन आम्ही असे स्थान निर्माण करत आहोत जिथे जगभरातील लोकांना करुणा आणि सामर्थ्य यांच्या बरोबरीनेच क्लिनिकल उत्कृष्टतेचे लाभ मिळत आहेत. आमची इच्छा आहे की पुणे आणि भारतातील प्रत्येक घराघरात आरोग्य आणि आनंद यांचा निवास सदैव राहो."




अपोलो हॉस्पिटल्सने आपल्या पुढील विस्तारासाठी पुण्याची निवड केली कारण त्यांनी ओळखले की या क्षेत्रातील लोकांच्या आरोग्यसंबंधी गरजा बदलत आहेत. त्यांनी आपल्या विस्तार योजना अशा पद्धतीने बनवल्या आहेत की नवीन, प्रगत तंत्रज्ञानाचा उपयोग करून शहरातील विविध लोक, समुदाय आणि संबंधित हितधारकांची ते अधिक चांगल्या प्रकारे सेवा करू शकतील.

अपोलो हॉस्पिटल्सच्या कार्यकारी उपाध्यक्ष डॉ प्रीता रेड्डी यांनी सांगितले,"अपोलो हॉस्पिटल्स पुणेमध्ये आम्ही क्लिनिकल उत्कृष्टता, करुणामय देखभाल आणि अथक नावीन्य यांच्या बळावर निर्माण केलेला, चार दशकांहून अधिक काळापासून चालत आलेला वारसा पुढे नेत आहोत. हे नवे हॉस्पिटल आरोग्य सेवांपर्यंत पोहोच आणि गुणवत्ता यांना पुढे नेण्याच्या आमच्या अचल बांधिलकीचे प्रतीक आहे, हे हॉस्पिटल सुरु करून आम्ही रुग्णांनी गेल्या अनेक पिढ्यांपासून आमच्यावर ठेवलेल्या विश्वासाचा सन्मान करत आहोत."

अपोलो हॉस्पिटल्स एंटरप्राइज लिमिटेडच्या व्यवस्थापकीय संचालिका श्रीमती सुनीता रेड्डी यांनी सांगितले,"आमचे पुणे हॉस्पिटल अपोलोच्या वाढत्या राष्ट्रीय विस्तारामध्ये उचलण्यात आलेले एक धोरणात्मक पाऊल आहे, जे भारतातील एका सर्वात वेगाने विकसित होत असलेल्या आरोग्य सेवा बाजारपेठांमध्ये अतिशय महत्त्वपूर्ण आहे. जास्तीत जास्त लोकांना उच्च स्तरीय क्वाटर्नरी देखभालीचे लाभ देण्यासाठी आमची एकात्मिक आरोग्य इकोसिस्टिम शहरात आणताना आम्हाला खूप आनंद होत आहे. महाराष्ट्रात आरोग्य देखभालीचे मजबूत आणि भविष्यासाठी सज्ज नेटवर्क तयार करण्यासाठी पुण्यातील क्लिनिकल टॅलेंटसोबत सहयोग करण्यासाठी आम्ही उत्सुक आहोत."

अपोलो हॉस्पिटल्सचे समूहाचे मुख्य कार्यकारी अधिकारी आणि अध्यक्ष डॉ मधू ससिधर यांनी सांगितले,"आमचे पुणे हॉस्पिटल सुरक्षा विज्ञान, पुराव्यांवर आधारित प्रॅक्टिस आणि एका अशा संस्कृतीच्या पायावर उभारण्यात आले आहे, ज्यामध्ये सर्व निर्णय रुग्णांना डोळ्यासमोर ठेवून घेतले जातात. जसजसे आम्ही पुढे जाऊ, रुग्णांच्या देखभालीप्रती आमची बांधिलकी मजबूत होत जाईल, जी उच्च दर्जा, पारदर्शक परिणाम, करुणा आणि क्लिनिकल दृढतेच्या माध्यमातून प्रदान केली जाईल."

अपोलो हॉस्पिटल्स पुणेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ मनीषा कर्माकर यांनी सांगितले,"पुणे शहरामध्ये आमचे नवे हॉस्पिटल क्लिनिकल उत्कृष्टतेप्रती अपोलोची बांधिलकी दर्शवते, इतकेच नव्हे तर एका अशा शहराच्या विकास आणि कल्याणमध्ये योगदान देत आहे जे तंत्रज्ञान आणि इनोव्हेशनचे केंद्र म्हणून भारताच्या भविष्याला आकार देत आहे."

# साईबाबांच्या मानाच्या उरणच्या पालखीला महेंद्रशेठ घरत यांचा खांदा!; महेंद्रशेठ घरत यांच्यातर्फे साईभक्तांना टी-शर्ट

**उलवे :** "उरण येथील श्री साई सेवा मंडळाच्या मानाच्या पालखीची यथोचित पूजा मंगळवारी महेंद्रशेठ घरत यांच्या हस्ते दत्त मंदिरात करण्यात आली. यावेळी आरतीचा मानही साई भक्तांनी महेंद्रशेठ घरत यांना दिला. त्यानंतर श्री साई सेवा मंडळातर्फे त्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी महेंद्रशेठ घरत म्हणाले, "मी गेली ३८ वर्षे शिर्डीला न चुकता जातोय. १९८७ मध्ये मी न्हावायार्डला कामाला लागतात पहिल्यांदा एसटीने शिर्डीला गेलो होतो. तेव्हापासून साईबाबांचा आशीर्वाद मला मिळतोय. त्यामुळे सर्वच दिंड्यांना अनेक वर्षांपासून मी सढळ हस्ते मदत करतोय. साईबाबांचा आशीर्वाद माझ्या मागे कायम आहे. मी साईभक्त असल्यामुळेच माझ्या शेलघरमध्ये भव्यदिव्य साई मंदिर





बांधतोय. ते काम लवकरच पूर्ण होईल. त्यासाठी मी जिवाचा आटापिटा करतोय. साईबाबांनी आपल्याला श्रद्धा आणि सबुरीचा मंत्र दिला. माझी वाटचाल त्याच मार्गाने सुरू आहे. उरणमधून २५ वर्षांपूर्वी सुरू झालेली पालखीची परंपरा अखंड चालत राहावी, म्हणून मी दरवर्षी पालखीला येतो आणि मदतही करतो. कडक उन्हाळ्यात साईभक्तांना कुठल्याही प्रकारचा त्रास होऊ नये म्हणून साईबाबांकडे उरणच्या साईभक्तांसाठी सुखरूप प्रवासासाठी प्रार्थना करतो आणि मनापासून शुभेच्छा देतो. साईभक्तांनी मला आरती आणि पूजेचा मान दिल्याने मी धन्य झालो आहे."

मंगळवारी उरणमधून हजारो साईभक्त साईबाबांची पालखी घेऊन सकाळी साडेनऊच्या सुमारास पायी दिंडीने शिर्डीला निघाले. तेव्हा साईंच्या पालखीला महेंद्रशेठ यांनी खांदा दिला. यावेळी उरणच्या नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार भावना घाणेकर उपस्थित होत्या.

साईबाबांची पालखी श्री साई सेवा मंडळ उरण काढते. त्यांचे यंदा पालखीचे रौप्यमहोत्सवी वर्ष आहे, ही गौरवास्पद बाब आहे. त्यांचा आदर्श घेऊन उरण परिसरात शिर्डीला पायी दिंडीने निघण्याची परंपरा सुरू झाली आहे. त्यामुळे त्यांचा हा आदर्शवत प्रवास आहे, असेही आंतरराष्ट्रीय कामगार नेते आणि कॉंग्रेसचे रायगड जिल्हाध्यक्ष महेंद्रशेठ घरत यांनी साईबाबांच्या पालखी प्रस्थानावेळी आपले मत व्यक्त केले.

यावेळी साईंच्या चरणी पायी दिंडीद्वारे शिर्डीला जाणाऱ्या तरुणांना महेंद्रशेठ घरत यांच्यातर्फे टी-शर्ट देण्यात आले आहेत. गेल्या चार वर्षांपासून टी-शर्ट देण्याचा उपक्रम महेंद्रशेठ घरत यांनी सुरू ठेवला आहे. यावेळी एम. जी. ग्रुपचे सहकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

श्री साई सेवा मंडळाचे अध्यक्ष सतीश पाटील, कार्याध्यक्ष चंद्रकांत म्हात्रे, सेक्रेटरी जगदीश कडू, खजिनदार अमित कडू आणि मंडळाचे सदस्य, नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. साईनामाच्या गजरात उरणहून पालखी निघाली असून ३ डिसेंबरला शिर्डीला पोहोचेल.

# बाचेवाडी येथे भीम आर्मी शाखेचे उद्घाटन

**दैनिक युवक आधार**
**संजीव भांबोरे भंडारा -** जिल्ह्यातील पवनी तालुक्यातील बाचेवाडी येथे दिनांक २४ नोव्हेंबर २०२५ ला चंद्रशेखर आझाद प्रणित भीम आर्मी शाखा उद्घाटन सोहळा आयोजित करण्यात आला होता. त्या सोहळ्यामध्ये भीम आर्मीच्या पदाधिकारीद्वारे गावकरी लोकांना मार्गदर्शन केले. भीम आर्मीची आज आपल्या समाजाला गरज आहे याची जाणीव करून दिली व शाखा समिती नेमन्यात आली आणि नियुक्तीपत्र देऊन त्यांचे स्वागत करण्यात आले. यावेळी भंडारा जिल्हा अध्यक्ष विक्रांतभाऊ भालाधरे, भंडारा जिल्हा आमचे भाऊ दीपक भाऊ जनबंधू उपाध्यक्ष अमितभाऊ गोस्वामी, भंडारा जिल्हा संघटक महेंद्रभाऊ बन्सोड, जिल्हा महासचिव संजयजी वासनिक, पवनी तालुका अध्यक्ष शुभमभाऊ लोणारे, पवनी तालुका उपाध्यक्ष स्वर्णाताई तागडे



,भंडारा तालुका अध्यक्ष चेतन भाऊ कानेकर, भंडारा तालुका उपाध्यक्ष युगांतरभाऊ मेश्राम,जिल्हा प्रसिद्धी प्रमुख चव्हाण ,प्रमिलाताई गोसावी उपस्थित होते. भीम आर्मी गाव शाखा समिती नेमण्यात आली त्यामध्ये गाव शाखा अध्यक्ष जयप्रकाश रंगारी ,शाखा उपाध्यक्षा अर्चनाताई वानखेडे ,शाखा सचिव रत्नमालाताई वानखेडे , शाखा कोषाध्यक्ष प्रल्हाद वानखेडे ,शाखा संघटक गुणप्रियाताई वानखेडे नियुक्ती करण्यात आली.. भीम आर्मी द्वारे भीमसैनिकांनी संघटित येऊन अन्यायाविरुद्ध आपण एकत्र लढू व महिलांनी संघटनेमध्ये सहभाग घेऊन संघटना वाढवावी असे मोलाचे मार्गदर्शन केले. व अध्यक्ष विक्रांत भाऊ भालाधरे यांनी नियुक्तीपत्र देताना गावातील कार्यकर्त्यांनी आजूबाजू कुठे अन्याय होत असेल तर तिथे धावून पडावे गरज पडल्यास पदाधिकाऱ्यांची मदत घ्यावी , अशा सूचना कार्यकर्त्यांना दिल्या. तसेच कार्यक्रमाचे आयोजन व नियोजन भंडारा उपाध्यक्ष अमितभाऊ गोस्वामी , पवनी तालुका अध्यक्ष शुभम भाऊ लोणारे, पवनी तालुका उपाध्यक्ष स्वर्णाताई तागडे यांनी केले. पुनम ताई रंगारी यांची पवनी तालुका सचिव पदाकरिता निवड करण्यात आली.

# स्वतंत्र कोकण राज्य अभियानाचे संस्थापक संजय कोकरे यांनी नुकतीच "कोकण रत्न पदवी पुरस्कार साठी केली अधिकृत घोषणा

**दैनिक युवक आधार**
**मुंबई (शांताराम गुडेकर) :** विक्रोळी पार्क साईट येथील गुणवंत कामगार पुरस्कार-महाराष्ट्र शासन विजेते तसेच त्यांच्या पर्यावरण, शैक्षणिक, सामाजिक कार्याची दखल घेऊन श्री. श्रीराम विष्णू वैद्य यांची स्वतंत्र कोकण राज्य अभियानाचे संस्थापक संजय कोकरे यांनी नुकतीच "कोकण रत्न पदवी पुरस्कार साठी अधिकृत घोषणा केली आहे.वैद्य यांना हा पुरस्कार शनिवार दि. १३ डिसेंबर २०२५ रोजी संध्याकाळी ४ ते ६ या वेळेत मराठी पत्रकार भवन, आझाद मैदान शेजारी, मुंबई येथे होणारा हा कार्यक्रम संस्थेचे संस्थापक संजय कोकरे यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न होणार आहे. या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून ज्येष्ठ पत्रकार आणि संपादक सचिन कळझुनकर सर उपस्थित राहणार आहेत. तसेच या संस्थेचे मुंबई अध्यक्ष धनंजय कुवेसकर, खजिनदार राजेंद्र सुर्वे, नेते सुभाष राणे आणि सल्लागार दिलीप लाड



हेसुद्धा या कार्यक्रमाला हजर राहणार आहेत.शिवाय विविध क्षेत्रातील मान्यवरांना देखील या दरम्यान कोकण रत्न पदवी देऊन सन्मानित करण्यात येणार आहे.

श्रीराम वैद्य हे गेली ४५ वर्ष सामाजिक कार्यात कार्यरत आहेत. अनेक संघटनांवर पदाधिकारी,सदस्य म्हणून काम पाहत आहेत.त्यांना आजवर विशेष कार्यकारी अधिकारी,गणुवंत कामगार पुरस्कार, आदर्श मित्र पुरस्कार, राष्ट्रीय सामाजिक एकता गौरव पुरस्कार, मुंबई रत्न पुरस्कार, समाज गौरव पुरस्कार, कोकण दिप सामाजिक सेवा पुरस्कार, कामगार भूषण पुरस्कार, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर रयत सेवक पुरस्कार, आदर्श मुंबईकर महापौर सन्मान पत्र, नशाबंदी मंडळ महाराष्ट्र राज्याचे गौरव पत्र, नशाबंदी मंडळ नागरिक समिती गौरवपत्र, रक्तदान शिबिर प्रशस्तीपत्र, कामगार सभा आकाशवाणी मुलाखत, नागरी संरक्षण दल, बृहनमुंबई, डॉ. बाबासाहेब आंबेडकर राष्ट्रीय फेलोशिप, स्वकुळ वैभव पुरस्कार व संकल्प कृतार्थ जीवन गौरव पुरस्कार आदी पुरस्कार मिळालेले आहेत.ते कार्यकारी सदस्य महाराष्ट्र गुणवंत कामगार संघटना मुंबई,रायगड जिल्हा स्वकुळ साळी सेवा मंडळ मुंबई चे सदस्य आहेत.नेत्र तपासणी व चष्मा वाटप, एडस जनजागृती अभियान, पोलीओ डोस अभियान, बाल माता संगोपन शिबीर, शारीरिक वैद्यकिय तपासणी, मार्गदर्शन व उपचार केंद्र आदी शिबीर मध्ये त्याचा मोलाची कामगिरी आहे.शिवसेना ग्राहक संरक्षण मंच, गुरूदत्त मंडळ (कला, क्रिडा, शैक्षणिक) वि. पा. शा. मुंबई सल्लागार, वि. पा. सा सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ - सदस्य आहेत.श्री.श्रीराम विष्णू वैद्य (विशेष कार्यकारी अधिकारी,(डॉ. बाबासाहेब आंबेडकर राष्ट्रीय फेलो शिप विजेता)यांना सामाजिक कार्याची दखल घेऊन त्यांना हा मानाची पदवी पुरस्कार प्रदान करण्यात येणार असल्यामुळे त्याच्यावर अभिनंदनसह शुभेच्छाचा वर्षाव होत आहे.

# गजानन ढवळे यांच्या उमेदवारी नें मत्तबरांना कडवे आव्हान शिंदे गट शिवसेंनेनेचे कडवे आव्हान

## घाटंजी तालुक्यातील भाजपने डावललेल्या गजानन ढवळे यांची शिंदे गटात दमदार एंट्री

**दैनिक युवक आधार**
**घाटंजी तालुका प्रतिनिधी महेश पेन्दोर :** घाटंजीच्या राजकारणात सध्या मोठा भूकंप झाला आहे, कारण भाजपचे संभाव्य उमेदवार असलेले गजानन ढवळे यांनी पक्षांतर्गत नाराजीमुळे थेट उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेत प्रवेश केला आहे. या प्रवेशामुळे आगामी नगरपरिषद निवडणुकीच्या तोंडावर भाजपला कडवे आव्हान उभे राहिले आहे. निवडणुकांचे पडघम वाजू लागताच, आमदार गटाकडून गजानन ढवळे यांना भाजपचे संभाव्य उमेदवार म्हणून पसंती मिळाली होती.

मात्र, नगरपरिषद निवडणुकीसाठी भाजपने ढवळे यांच्याऐवजी दुसऱ्या उमेदवाराला नगराध्यक्ष पदाचा उमेदवार म्हणून घोषित केले, ज्यामुळे ढवळे गट नाराज झाला.यामुळे गजानन ढवळे यांनी भाजपला रामराम ठोकत राजकीय हालचालींना वेग दिला. यवतमाळ जिल्ह्यातील राजकारणातील मोठे नाव असलेले आणि शिंदे गटाचे नेते सलीम खेतानी यांच्या संपर्कातून गजानन ढवळे यांनी शिवसेनेत (शिंदे गट) मध्ये प्रवेश केला. शिंदे गटात प्रवेश करताच, त्यांची उमेदवारी पक्की ठरली. शिंदे गटाने 10



प्रभागांमध्ये एकूण 20 उमेदवार दिले, ज्यामुळे शिवसेनेला मोठे बळ मिळाले आहे.ढवळे यांच्या पक्षांतराने भाजपमधील एक गट पूर्णतः शिंदे गटात सामील झाला. अतिशय कमी वेळात, कोणतेही मोठे संघटनात्मक पाठबळ नसतानाही, ढवळे यांनी पक्षाला मोठे बळ दिले आहे.

गजानन ढवळे यांच्या उमेदवारीमुळे संपूर्ण पक्ष (शिंदे गट) अजुन मोठ्या आत्मविश्वासाने त्यांच्यामागे उभा आहे.

सध्या शिंदे गटाची घोडदौड विजयाच्या मार्गावर सुरू असून, घाटांजीचा नगराध्यक्ष कोण होणार, हे येणारा काळच ठरवेल.

या सर्व घडामोडींमुळे घाटंजीच्या राजकारणात मोठी चुरस निर्माण झाली असून, शिंदे गटाने भाजपने डावललेल्या उमेदवाराला संधी देऊन मास्टरस्ट्रोक खेळल्याचे बोलले जात आहे.

# शिळ कल्याण रस्त्यावर देसाई खाडीत आढळून आला आहे तरुणींचा मृतदेह

**दैनिक युवक आधार**
**उल्हासनगर/रशीद शेख :** शिळफाटा - कल्याण रस्त्यावरील देसाई खाडी पुलाखाली नदि पात्रांच्या काठाला एक 25 ते 30 वर्षीच्या तरुणींचा सुटकेस मध्य मृतदेह आढळून आल्याने खळबळ उडाली आहे दुपारी या पुलावरून जाणाऱ्या काही पादचाऱ्यांना हा मृतदेह निदर्शनास आले आला आहे शीळ डायघर पोलिसांना याप्रकरणाची माहिती देण्यात आली पोलिस तातडीने घटनास्थळी दाखल झाले या तरुणीला घर किंवा अन्य ठिकाणी मारुन तिला सुटकेस मध्य भरुन रात्रीच्या वेळेस देसाई खाडी किनारी आणुन टाकलें असावे असा प्राथमिक अंदाज पोलिसांनी वर्तवला आहे देसाई खाडी



पात्रात एका तरुणीचा मृतदेह एका सुटकेसमध्ये भरून आणून टाकला असल्याची माहिती मिळाल्यावर या पुलावरून जाणाऱ्यांची मोटर

दुचाकी आणि इतर वाहन चालकांनी वाहने थांबून घटनास्थळांची आणि संबंधित कोणी परिचित आहे का यासाठी प्रयत्न केले एकावेळी सर्वच वाहने पुलावर थांबल्याने फुलाच्या एका रांगेत वाहनाची कोंडी झाली होती वाहतूक पोलीस आल्यानंतर त्यांनी एकाही वाहन चालकाला पुलावर वाहन उभे करू नये अशा सूचना केल्यास त्यामुळे पुलाचा मार्ग मोकळा झाला तरीही अनेक वाहन चालक फुलाच्या दोन्हीं बाजूला थांबून घटनास्थळाची माहिती घेत होते ठाणे मुंबई कल्याण डोंबिवली परिसरात कोठे तरुणी बेपत्ता असल्याची नोंद आहे का याचा तपास पोलीस करत आहेत या नोंदीवरून या तरुणीची ओळख पटविणे आणि तिच्या नातेवाईकांचा शोध घेणे पोलिसांना शक्य होणार असून पोलीस तपास सुरू करण्यात आला आहे

# दिल्ली पब्लिक स्कूल मिहान येथे दोन दिवसीय MIMUN ५.0 चे भव्य समापन

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी राहुल मडावी**
**नागपूर :** दिल्ली पब्लिक स्कूल मिहानच्या मिमुन ५.० या दोन दिवसांच्या अर्थपूर्ण चर्चा आणि राजनैतिकतेचा सन्मानजनक समारोप झाला आणि त्यात यश आणि जागतिक दृष्टिकोण यावर प्रकाश टाकण्यात आला. राजनैतिकता, उत्कृष्टता आणि युवा नेतृत्वाचा उत्सव साजरा करणारा भव्य समारोप समारंभ २३ नोव्हेंबर २०२५ रोजी शाळेच्या विस्तीर्ण कॅम्पसच्या ए.व्ही. हॉलमध्ये आयोजित करण्यात आला होता. 'शाश्वत भविष्यासाठी शाश्वत मार्गांवर जबाबदार विचारमंथन' या थीमवर लक्ष केंद्रित करून, राज्यभरातील ५० संस्थांमधील सुमारे ३२० तरुण प्रतिनिधींनी जागतिक मुद्द्यांवर चर्चा करण्यासाठी आणि राजनैतिक आणि वाटाघाटींच्या कलेच्या माध्यमातून ठोस उपाय शोधण्यासाठी दोन दिवसांच्या या कार्यक्रमात भाग घेतला. दिल्ली पब्लिक स्कूल मिहान आणि कामठी रोड, नागपूरच्या अध्यक्षा आणि प्रो-व्हाईस चेअरपर्सन तुलिका केडिया आणि संचालिका सविता जयस्वाल यांनी ऑनलाइन पद्धतीने समारंभात भाग घेतला आणि मिमुन ५.० ला अत्यंत यशस्वी कार्यक्रम बनवल्याबद्दल प्रतिनिधींचे अभिनंदन केले. हॉटेल व कॅफेच्या जगात नवकल्पना आणि निर्भय महत्त्वाकांक्षेने आदरातिथ्याची पुनर्परिभाषा करणारे तरुण उद्योजक, मात्रा कॅफेचे संस्थापक कान्हा जयस्वाल यांनी या कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थिती लावली. त्यांनी आपल्या भाषणात, प्रतिनिधींना



परिश्रमपूर्वक काम करण्याचे आणि त्यांच्या उद्योजकीय प्रवासातील मौल्यवान घटना सांगताना केवळ निकालांवरच नव्हे तर प्रयत्नांवर लक्ष केंद्रित करण्याचे आवाहन केले. तत्पूर्वी, प्राचार्या निधी यादव यांनी आपल्या भाषणात मान्यवरांचे त्यांच्या प्रमुख उपस्थितीबद्दल आभार मानले आणि आशा व्यक्त केली की या परिषदेमुळे तरुण प्रतिनिधींना समावेशकतेची मूल्ये समजून घेताना आणि इतरांच्या विचारांचे मूल्यमापन करताना सहकार्य आणि राजनैतिकतेचा अनुभव आला आहे. गॅलेक्टिक कौन्सिल आणि डेमन स्लेअर सारख्या काल्पनिक समित्यांसाठी अनुक्रमे सर्वोत्कृष्ट प्रतिनिधी: वंश मणियार (UNSC), पार्थ पनपालिया, तविश बिस्वास (IPL), अनय ताजने (GC), प्रणिल पवार (LOKSABHA), अरणा हांडा (UNGA),अदिती पांडे (WHO), अर्णव अंबरे (UNHRC) गीतिका अय्यर (UNCSW),माही जोशी (IP-),शौर्य झोटिंग (IP),श्रीवल्लभ चाबुकस्वार (DEMON SLAYER) आणि हृदय अवचट (FIFA) यांना त्यांच्या उत्कृष्ट योगदानासाठी त्यांच्या संबंधित अध्यक्षांनी सर्वोत्कृष्ट प्रतिनिधी म्हणून निवडले. शाळेच्या नृत्य मंडळाच्या एकतेच्या भावनेवर प्रकाश टाकणाऱ्या आणि शाळेच्या गायनगटाच्या आकर्षक सादरीकरणाने, उत्साही शालेय बँड, मेलडी एक्सप्लोरर्ससह, कार्यक्रमाच्या रंगीन जल्लोषात भर घातली. जिया बुधादेव आणि जय वर्मा यांनी कार्यक्रमाचे संचालन तर उपाध्यक्षा ध्वनी प्रधानने सर्वांचे आभार मानले.